म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का० वा०
दा. क्र. 3390

बांध ०७

# तालपुष्कर

[ कादंबरी ]

शान्ता ज. शेळके, एम्. ए.

कुलकर्णी ग्रंथागार, पुणे २.

IRBK-0103390
IRBK-0103390

मूल्य दीड रुपया



# नाटपुष्कर

शान्ता ज. शेळके
एम. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

610 8ho
3390

किशोर-प्रकाशन

अनुक्रम ३७५४२
विभाग
क्रमांक
नों. दि.

# ताळपुष्कर

शान्ता ज. शेळके, एम्. ए.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र. ................ नों. दि ................
वि. ................ क्र. ................
IRBK-0103390
IRBK-0103390

किंमत दीड रुपया

सर्व हक्क पंडित अनंत कुलकर्णी यांचे स्वाधीन
आवृत्ति पहिली १९५०, : पुनर्मुद्रण १९६४,
प्रकाशक : पंडित अनंत कुलकर्णी, कुलकर्णी ग्रंथागार, १८६ शनवार, पुणें २
मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, 'शिव-पार्वती' टिळक रोड, पुणें २

सुप्रसिद्ध बंगाली लेखक श्री. रमेशचंद्र दत्त यांची 'संसार' नामक कादंबरी 'Lake of Palms' या नांवानें इंग्रजींत भाषान्तरित झालेली होती. तीवरून 'तालपुष्कर' ही कादंबरी तयार केलेली आहे.

'तालपुष्कर' ही कथा बंगालींत बरीच लोकप्रिय झाली होती. बंगाल्यांतील ग्रामीण जीवनाचें मनोहर चित्र तींमध्यें रेखाटलेलें आहे. 'बालविधवेचें पुनर्लग्न' हा या कादंबरीचा प्रतिपाद्य विषय असला तरी त्या विषयाच्या अनुषंगानें कथेंत आलेल्या निरनिराळ्या स्त्रीपुरुषांचीं जिवंत व रेखीव स्वभावचित्रणें हेंच या कादंबरीचे प्रमुख आकर्षण आहे. संसार-दक्ष व पतिपरायण विंदू, मुग्ध व निर्मळ मनाची सुधा, दुर्दैवी उमा, पश्चातापदग्ध धनंजय व प्रेमळ शरच्चंद्र ह्या सर्वच व्यक्ति आपापल्यापरी वाचकांचें मन वेधून घेतात.

ज्या बालवाचकांकरतां ही सुंदर कथा अनुवादित केली आहे ते तिचें प्रेमानें स्वागत करतील अशी मी आशा करतें.

पुणें २
ऑगस्ट ५०

शान्ता ज. शेळके

अनुक्रम ३८५४२
विभाग बा.वा.
क्रमांक ३२८.३
नों. दि. २८।११।८०

# मायलेकी



वंगाल प्रांताच्या भूमीवर, बाजारच्या गांवापासून कांहीं मैलावर 'तालपुष्कर' हें सुंदर खेडें वसलें आहे. जवळच भातशेतांच्या लांबरुंद पट्ट्यांच्या परिसरांत तालवृक्षांनीं वेढलेलें एक रमणीय तळें आहे. या तालतरुवेष्टित जलाशयामुळेंच त्या खेड्याला 'तालपुष्कर' हें नांव मिळालेलें आहे.

त्या दिवशीं सायंकाळची वेळ उलटून गेली होती. तालवृक्षांच्या गर्द राईनें वेष्टिलेल्या तळ्यावर काळोखाची घनदाट छाया पसरली होती. आकाश मेघांनीं व्याप्त झालें होतें. तालवृक्षांच्या शेंड्यांमधून वाऱ्याची गूढ सळसळ चालली होती. माथ्यावर चारदोन चांदण्या मंदपणें चमकत होत्या आणि दूर अंतरावर असलेल्या खेड्यामधले दिवे काळोखांत ठिणग्याप्रमाणें भासत होते. तळ्याच्या कांठीं कमरेइतक्या पाण्यांत उभी राहून एक स्त्री संध्यावंदन करीत होती. तळ्याच्या पायऱ्यावर नऊ वर्षांची एक बालिका आपल्या धाकट्या बहिणीला कडेवर घेऊन उभी होती. तिच्या शेजारीं मातीचा एक घडा पाण्यानें भरून घरीं न्यावयासाठीं म्हणून ठेवलेला होता. तळ्यांत उभ्या असलेल्या त्या स्त्रीचें संध्यावंदन आटोपतें आहे तोंवर या मंडळींचा आपण परिचय करून घेऊं या.

हरिदास मुळीक हे कायस्थ गृहस्थ होते. कायस्थानें हातांत कधीं नांगर धरावयाचा नसल्यामुळें आपल्या मालकीची पांच सहा एकर जमीन

त्यांनीं खंडानें करावयास दिली होती. खंडकऱ्यांचे पैसे चुकवल्यावर घर-खर्चीचांसा हरिदासबाबूंजवळ फारच थोडा पैसा राही. आणि त्यामुळें अधूनमधून तारिणीबाबूंकडून त्यांना थोडीशी मदत घेणें भाग पडे. तारिणी-बाबू हे हरिदासबाबूंचे चुलत बंधू. ते स्वतः बरद्वानला नोकरीस असत. पण त्यांचें कुटुंब तालपुष्करला असे. तारिणीबाबू खूप श्रीमंत होते.

हरिदासबाबूंचा विवाह एका गरीब कायस्थ घराण्यांतील मुलीशीं झाला होता. लग्नानंतर सुमारें पंधरा वर्षांनीं त्यांना एक मुलगी झाली. तिचें नांव त्यांनीं 'बिंदू' ठेवलें होतें. तारिणीबाबूंनाहि बिंदूच्याच वयाची एक मुलगी होती. तिचें नांव उमा. दुर्गापूजेसाठीं बरद्वानहून तारिणीबाबू तालपुष्करला येत तेव्हां उमेसाठीं ते सोन्याच्या बांगड्या, चांदीच्या तोरड्या आणि डाक्क्याच्या मलमली साड्या घेऊन येत. आपल्या बिंदूलाहि असेच अलं-कार असावेत असे हरिदासबाबूंना वाटे, पण दारिद्र्यामुळें त्यांचा नाइलाज होई व मग त्यांचें हृदय दुःखानें भरून येई.

बिंदू आणि उमा या दोघींची फारच मैत्री होती. श्रीमंत उमेनें आपल्या घरीं चुलत बहिणीला कधीं तुच्छतेने वागवलें नाहीं. आपला खेळ आणि खाऊ ती मोठ्या आनंदानें बिंदूला देई. बिंदूच्या पाठीवर चार वर्षांनीं सुधेचा जन्म झाला. गौरवर्ण, भ्रमरासारखे काळेभोर चंचल नेत्र, बिंबफळासारखे ओठ आणि अमृतासारखे मधुर हास्य यांमुळें सुधा अत्यंत सुंदर दिसे. आतां हरिदासबाबू पूर्वीहूनहि अधिक कष्ट करूं लागले; पण वाढत्या दारिद्र्यापुढें त्यांचा निभाव लागेना. सुधा चार वर्षांची होते न होते तोंच गरिबीमुळें टेकीला आलेले व काबाडकष्टांनीं रंजीस आलेले हरिदासबाबू आपल्या प्रिय पत्नीला व लाडक्या कन्यकांना निरा-धार अवस्थेंत सोडून परलोकीं निघून गेले! बिंदूच्या आईवर आभाळच कोसळलें. आपलें रहातें घर विकून टाकून ती दीराच्या-तारिणीबाबूंच्या घरीं राहावयास आली. व धुणीं भांडीं, स्वयंपाक करून आपले वैधव्याचे

दुःखी दिवस कसेबसे घालवूं लागली. आतां तिच्या हृदयांत एकच आशा होती. " माझी बिंदू व सुधा यांना चांगलीं स्थळें मिळून त्या आपापल्या सासरीं नांदूं लागल्या म्हणजे मी सुखानें डोळे मिटीन ! " असें ती दिवसांतून दहादां स्वतःशीं म्हणे.

स्नान व पूजा आटोपल्यावर बिंदूची आई पाण्यांतून बाहेर आली. व तिघी मायलेकी घराकडे जावयास निघाल्या. सुधा झोपली असल्यामुळें बिंदूनें तिला खांद्यावर टाकलें होतें. घरीं जातांना बिंदू आईला म्हणाली, " आई ग, आपली उमाताई अन् काली-दोघीजणी परवां अग्रदीप येथें जत्रेला गेल्या होत्या. त्यांनीं तिथून कशीं सुंदर सुंदर खेळणीं आणलीं आहेत बघ ना ? मला नाहीं का ग जत्रेला जातां यायचं ? "

" नाहीं बाळ " बिंदूची आई म्हणाली, " उमाचे वडील श्रीमन्त आहेत. कालीचेहि वडील श्रीमन्त आहेत. पण आपण गरीब आहोंत बेटा. आपल्याला कुठून खेळणीं मिळणार ? "

आतां गाढ काळोख पडला होता. विजा चमकत होत्या. वारा झाडाच्या पालवींतून स्फुंदत होता. सर्वत्र शान्ततेचें आवरण पसरलें होतें. एखादी चांदणी चमकत होती. दूर कोल्हे ओरडत होते. अशा त्या निःस्तब्ध उदास रात्रीं ती गरीब विधवा आपल्या दोन लाडक्या लेकींसह गर्द वनराईंतल्या एकाकी वाटेवरून चालली होती. तिच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रु भोंवतालच्या काळोखाशिवाय अन्य कुणीहि पाहिले नाहींत.

## बारा वर्षांनन्तर



दिराच्या घरीं बिंदूची आई आपले वैधव्याचे दिवस कंठित असतां तिला एकच काळजी लागून राहिली होती व ती म्हणजे बिंदूच्या लग्नाची. तारिणीबाबू किंवा त्यांची पत्नी कुणीच या बाबतींत लक्ष घालीना. बिंदूच्या आईनें गांवांतल्या प्रतिष्ठितांची मनधरणी केली पण ते सुद्धां नुसती कोरडीं आश्वासनें देत आणि मग पुढें ती गोष्ट विसरून जात. बिंदूची आई हताश झाली. वर्षांमागून वर्षे जात होती. बिंदू मोठी होत चालली होती. चिंतेमुळें बिंदूच्या आईची झोंप नष्ट झाली. पण अखेर एके दिवशीं परमेश्वरालाच या निराधार विधवेची करुणा आली. बिंदूच्या वडिलांचे एक जिवलग मित्र तालपुष्करलाच रहात होते. त्यांचें नांव बसू. या बसू महाशयांचा तरुण मुलगा हेमचंद्र बरद्वान हायस्कूलांतून मॅट्रिक होऊन कलकत्ता युनिव्हर्सिटींत शिकत होता. वडिलांचा एकाएकीं मृत्यु झाल्यामुळें शिकणें अर्धवट सोडून तो पुन्हां तालपुष्करला आला. छोट्या बिंदूला बालपणीं त्यानें अनेकदां पाहिलेलें होतें. आतां तालपुष्करला आल्यानंतर आपल्या वडिलांच्या मित्राच्या या निर्धन मुलीशीं विवाह करावयाचें त्यानें ठरवलें आणि या बाबतींत कुणाचें कांहींहि न ऐकतां आपला निर्धार त्यानें तडीस नेला. बिंदूच्या आईचें हृदय कृतज्ञतेनें किती उचंबळून आलें असेल तें सांगावयाला नकोच. तारणीबाबूंना व त्यांच्या पत्नीलाहि विनासायास पुतणीला चांगलें स्थळ मिळाल्याबद्दल समाधान वाटलें. उमाचेंहि लग्न त्याच

वर्षी झालें. एका अत्यंत खानदान व धनाढ्य घराण्यांत उमा पडली. कारण ती अतिशय लावण्यसंपन्न होती. लग्नाच्या वेळीं उमा व बिंदू दोघींजणी बारा वर्षांच्या होत्या.

नंतर सुधाचेंहि लग्न दहाव्या वर्षी झालें आणि आपल्या दोघी मुलींचीं लग्नें झालेलीं बघून त्यांच्या आईनें सुखासमाधानानें डोळे मिटले. हेमचंद्र व बिंदू यांचा संसार सुखानें चालला होता. पण बिचाऱ्या सुधेचें दैव खडतर होतें. लग्नानंतर दोन वर्षांतच ती विधवा झाली. आपल्या दुर्दैवी बहिणीला बिंदूनें आपल्या घरीं आणलें. आणि बहिणीच्या व मेव्हण्याच्या प्रेमळ वात्सल्याच्या छायेंत सुधा सुखानें राहूं लागली. दैवानें तिला विधवा केलें होतें; पण ती अजूनहि मुग्ध, अल्लड आणि निरागस अशी बालिकाच राहिली होती. ती बाहुल्यांबरोबर खेळे, मांजराच्या पिलांशीं लडिवाळपणें क्रीडा करी आणि आपल्या मेव्हण्याची-हेमचंद्राची-मस्करी करी.

बिंदूचें घर ' तालपुष्कर ' येथें वृक्षाच्या घनदाट राईंत होतें. दाराशीं कांहीं नारळीचीं झाडें होतीं. व्हरांड्याला बसवलेल्या बांबूच्या जाळीवर वेली चढल्या होत्या. पलिकडे गोठा होता. सारें घर बिंदू आरशासारखें लख्ख ठेवीत असे. तिचें वय आतां सुमारें वीस वर्षांचें होतें व तिला दोन मुलेंहि पण झालीं होतीं. आपल्या पतीविषयीं बिंदूला अत्यंत प्रेम व भक्तिभाव वाटे. ती आदर्श गृहिणी होती. तिच्या सुरूप चर्येवर आणि काळ्याभोर डोळ्यांत गंभीर मार्दव भरून राहिलें होतें. तिच्या हाल-चालींत संथपणा आणि शालीनता दिसे. सोळा वर्षांची सुधा आपल्या बहिणीहून अगदीं वेगळी दिसत होती. तिचे ओंठ हंसरे होते. आणि डोळे चंचल व चमकदार होते. तिचा स्वभाव मिष्किल व थट्टेखोर होता. तिचे काळेभोर कुरळे केस तिच्या गोऱ्यापान गालावर सारखे बागडत असत. आणि तिचे गोल डौलदार बाहू पाहून पुष्पगुच्छांनीं बहरलेल्या वेलीची आठवण होई. सारा दिवसभर सुधा एखाद्या बालकाप्रमाणें निश्चित-

पणें हसतखेळत असे. तिची ती मुग्ध व खेळकर मूर्ति पाहिली म्हणजे विंदूचें हृदय दुःखानें भरून येई व ती स्वतःशींच एक उसासा टाकून म्हणे, "या कोवळ्या आणि निष्पाप पोरीच्या नशीबीं खडतर वैधव्य दैवानें कां बरें लिहून टेवलं ?"

# बिंदू आणि उमा



मध्यरात्रीची वेळ. तालतरूंच्या दीर्घ रांगांच्या छायेंत तालपुष्कर खेडें झोपीं गेलें होतें. निरभ्र आकाशांत चंद्रमा पूर्ण वैभवानें तळपत होता. त्याचे किरण तळ्याच्या पाण्यावर नाचत होते. तालवृक्षांच्या पालवींतून जमिनीवर ठिकठिकाणीं चांदण्याचे कवडसे पडले होते. व त्यामुळें सर्वत्र जाईचीं शुभ्र फुलें अंथरल्याचा भास होत होता. चहुंकडे गाढ शांतता पसरली होती. क्वचित् कुठें एकादा म्हातारा आपल्या घराच्या ओटीवर विडी ओढीत बसलेला असेल तेवढाच काय तो. बाकी सर्वजण आपापल्या घरांत निद्रावश झाले होते.

बिंदूच्या घरांत मात्र अद्यापहि दिवा जळत होता. बिंदूचा पति हेमचंद्र कांहीं कामासाठीं शेजारच्या गांवीं गेला होता. त्याची वाट बघत बिंदू जागत बसली होती. तिचीं दोन लहान मुलें व सुधा केव्हांच झोपीं गेलीं होतीं.

दाराशीं हेमचंद्राच्या पावलाची चाहूल लागतांच बिंदूनें उत्सुकतेनें जाऊन दार उघडलें व हेमचंद्र आंत आला. त्याचें वय सुमारें चोवीस वर्षांचें होतें. त्याचें कपाळ उंच व भव्य होतें. चेहरा देखणा होता. आणि डोळ्यांत संथ विचारशीलता होती. तो दिवसभराच्या प्रवासानें शिणलेला दिसत होता. बिंदूनें त्याला हातपाय धुवावयास कढत पाणी दिलें. आणि मग तिनें स्वयंपाकघरांतून त्याचें पान वाढून आणलें. भात,

चटणी, माशांची आमटी आणि भाजी असा जेवणाचा थाट होता. हेमचंद्र जेवावयास बसला आणि मग त्या पतिपत्नींचें संभाषण सुरू झालें.

" आज मी कटव्याला माझ्या एका वकील मित्राकडे गेलों होतों. " हेमचंद्र सांगूं लागला, " तुझ्या वडिलांचीं शेतें तुझ्या काकांकडे आतां आहेत ना, तीं आपणांस परत मिळतील किंवा काय याबद्दल चौकशी करून आलों. "

बिंदूची चर्या चिंताग्रस्त झाली. तिनें प्रश्न केला, " वकिलानें काय सांगितलें ? "

" वकील म्हणतो—" हेमचंद्रानें सांगितलें, " कोर्टांत काकांवर दावा लावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. "

" छे छे ! " बिंदू एकदम चुमकून म्हणाली, " आमच्या वडिलांच्या पाठीमागें पोटच्या मुलींप्रमाणें काकांनीं आम्हांला सांभाळलें, आमचें पालनपोषण केलें, काकूनें तर उमांत अन् माझ्यांत कधीं भेदभाव केला नाहीं. अन् त्यांच्यावर आपण दावा लावायचा ? शोभेल का हें आपल्याला ? त्यापेक्षां आपण आपले आहे या परिस्थितींतच सुखानं राहूं या. शेतें घेऊन करायचें आहे काय आपल्याला ? मला तर माझें हें घर राजवाड्याहून अधिक मोलाचें वाटतें. "

हेमचंद्राच्या चेहऱ्यावरून झरकन् एक विषण्णतेची छाया उमटून गेली. तो किंचित् कांपऱ्या स्वरांत म्हणाला, " या दरिद्री झोंपडीला तूं राजवाडा म्हणतेस हा तुझ्या मनाचा मोठेपणा बिंदू. पण म्हणून माझ्या लाडक्या पत्नीनं नेहमीं दारिद्र्यांत रहावं असं मला वाटेल का ? "

" पुरे पुरे-" त्याच्या भातावर दूध ओतीत बिंदू म्हणाली, " मी सांगितलं ना एकदां कीं आहे या परिस्थितींत मी अत्यंत सुखी आहे ! माझं हें घर आणि तुमचे हे पाय असले म्हणजे आणखी दुसरें मला कांहींसुद्धां नको ! "

जेवणानंतर बिंदूनें दिलेला विडा तोंडांत टाकून हेमचंद्र म्हणाला, " मग या जमिनींच्या बावतींत काय करावं ?" "काय करायचं आहे ?" बिंदू तात्काळ म्हणाली, " काकांकडे उद्यां जावं आणि गोडीगुलावीनं साऱ्या गोष्टी मिटवाव्यात. "

" तुझे काका शेतं तर कांहीं देत नाहींत. तो प्रयत्न मी करून वघितला आहे. शेताऐवजीं कांहींतरी एखादं लहानसं बक्षिस ते तुम्हां दोघी वहिणींना देतील. " हेमचंद्रानें सांगितलें.

"मीं तर बोलूनचालून वाई माणूस आहे—" बिंदू म्हणाली, " मला तुमचा कायदा नि कोर्ट कांहीं कळतच नाहीं. पण मला एवढं मात्र कळतं कीं वडील माणसांशीं कज्जे खटले करूं नयेत. त्यांत आपलं कल्याण होणार नाहीं. त्यापेक्षां काका प्रेमानं जें कांहीं देतील तेंच आपण घेऊं या. त्यांतच खरा मोठेपणा आहे."

हेमचंद्रानें क्षणभर स्तब्ध राहून आपल्या पत्नीकडे निरखून पाहिलें आणि मग त्याचें हृदय प्रेमानें आणि अभिमानानें उचंबळून आलें. स्नेहभरित स्वरानें तो म्हणाला, " बिंदू, तुझ्यासारखी सहचरी ज्याला मिळाली तो या पृथ्वीवरचा सर्वांत भाग्यशाली प्राणी म्हणावयाला पाहिजे. तूं दिलास तो सल्ला मला अगदीं पूर्णपणें पटला. यापुढें जेव्हां जेव्हां मला अशा सल्ल्याची जरूर पडेल त्या त्या वेळीं इतर कुणाहिकडे जाण्याऐवजीं प्रथम मीं तुलाच त्या वावतींत विचारीन !"

दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें हेमचंद्र तारिणीबाबूंच्या घरीं गेला, तारिणीबाबूंचें घर त्यांच्या श्रीमंतीला व वैभवाला साजेसेंच होतें. हेमचंद्राला पाहतांच तारिणीबाबूंनीं प्रेमपूर्वक त्याचें स्वागत केलें. व त्याला एका गड्यावरोवर अन्तर्गृहांत पाठवून दिलें. हेमचंद्र आंत जातांच त्याच्या सासूबाई—उमाचीं आई-त्याला सामोऱ्या आल्या. हेमचंद्रानें जमिनीपर्यंत लवून सासूला आदरपूर्वक प्रणाम केला. उमाच्या आईचा एकंदर रुबाब

श्रीमंत व खानदान घराण्यांतील कर्त्या गृहिणीला साजेसाच होता. ती किंचित् ठेंगणी व स्थूल होती. तिची हालचाल संथ पण आपला अधिकार दर्शविणारी अशी असे. तिच्या अंगावर बहुमोल वस्त्रालंकार होते. तिच्या भाषेंत अहंकाराची किंचित छटा असे पण स्वभावानें ती प्रेमळ व उदार होती. जावयाला पाहिल्यावर किती बोलूं व किती नको, असें तिला होऊन गेलें. माहेरवासाला आलेली उमा तेवढ्यांत जर तेथें आली नसती तर सासूबाईच्या तडाख्यांतून हेमचंद्राची सुटका लौकर होणें मुष्किलच होतें.

उमाहि धनपूरच्या दिवाण धनेश्वरांची सून झाली होती. धनेश्वरांच्या घरांतलें भारीभारी जडजवाहीर तिच्या अंगाखांद्यावर झळकत होतें. उमेचें लावण्य दृष्ट लावण्याजोगें होतें. तिचें वय वीस वर्षांचें होतें. तिचा वर्ण पीतगौर होता आणि तिच्या मुखावर स्त्रीत्वाची अनुपम कांति विलसत होती. उमेच्या सौंदर्याला साऱ्या तालपुष्करांत तोड नव्हती. आपल्या काळ्याभोर, दाट व लांबलचक केसांचा तिनें अंबाडा बांधला होता व यांत एक हिऱ्याचें फुलपाखरूं बसवलें होतें. तिच्या कपाळावर हिऱ्याची बिंदी चमकत होती. मूल्यवान् खडे बसविलेलीं तऱ्हेदार सुवर्णकंकणें तिच्या नाजूक हातांना भूषवीत होतीं. तिच्या कमरेला डौलदार कंबरपट्टा होता. तिच्या गळ्यांत हिऱ्याचें पेंडें व मोत्यांचा पांच पदरी सर रुळत होता.

मेव्हण्याला बघतांच उमा त्याची परोपरीने थट्टा करूं लागली. ती म्हणाली, “ वा वा ! आज आमचं अगदीं नशीबच उजाडलं म्हणायचं ? आज सकाळीं मी कुणाचें तोंड पाहिलें म्हणून आपल्या दर्शनाचा हा अलभ्य लाभ झाला बरें ? बिंदूताईनं आज इकडे यायला तुम्हाला परवानगी दिली वाटते ? पण भाऊजी, इथें फार वेळ थांबूं नका बरं का ? नाहींतर बिंदू तिकडे माझा मत्सर करायला लागेल ? ”

मेव्हणीच्या या अनावर थट्टेला पुरें पडण्याइतकें वाक्चातुर्य हेमचंद्राजवळ नव्हतें. त्यामुळें उमेशीं बोलतांना त्याची अगदीं तारांबळ उडून गेली. जरा वेळानें उमेनें थट्टा सोडून गंभीरपणें त्याच्याजवळ बिंदूची विचारपूस केली व दुसरे दिवशीं बिंदूला आपणांकडे गप्पा मारण्यासाठीं पाठविण्याचें तिनें हेमचंद्राकडून अभिवचन घेतलें. बिंदूच्या लहान मुलांना बघावयासाठीं ती उत्सुक होती. उमेचा स्वभाव प्रेमळ होता व श्रीमंतीमुळें तिच्या अंगीं काडीमात्रहि आढ्यता आलेली नव्हती.

बराच वेळ गप्पा झाल्यानंतर उमेनें हेमचंद्राला खूप आग्रह करून फराळासाठीं ठेवून घेतलें आणि त्याला चांगले चांगले पदार्थ मोठ्या हौसेनें खाऊं घातले. जेवत असतांना लावण्यवती उमेकडे पाहून हेमचंद्राच्या मनांत अनेक विचार आले. उमेच्या अप्रतिम सौंदर्यामुळेंच धनपूरच्या जमीनदारांच्या मुलानें पत्नी म्हणून तिची निवड केली होती हें त्याला माहीत होतें. पण उमेच्या पतीच्या वर्तणुकीविषयीं अनेक बऱ्यावाईट वदंता आतां त्याच्या कानांवर येत होत्या. बाह्यतः तर उमा सुखी दिसत होती आणि तालपुष्करांतील कित्येक स्त्रिया मनांतून तिच्या भाग्याचा हेवा करीत होत्या. उमेचें निष्कलंक सौंदर्य आणि अभिमानी उन्नत मस्तक बघतां बघतां तिच्या पतीविषयींच्या सर्व ऐकीव हकीगती आठवून हेमचंद्राच्या मनांत आलें, " या सुंदर मानी मुलीच्या अंतःकरणांत चिन्ता आणि दुःखें दडलेलीं असतील काय ? या भव्य कपाळावर कोणतें भवितव्य लिहून ठेवलेलें आहे ? "

## जुना मित्र ४

हेमचंद्राला तारिणीबाबूंकडून परत घरीं यायला जवळजवळ मध्यरात्र झाली. बिंदू त्याची वाट बघत दारांत उभी होती. पतीला येतांना पाहून तिच्या ओंठावर मिष्किल हंसूं उमटलें आणि तिचे डोळे आनंदानें चमकूं लागले. ती म्हणाली, " अगबाई, उमाच्या तावडींतून आतां सुटका झाली वाटतं स्वारीची ! बरं ते जाऊं दे. आधीं घरांत या. आपल्याकडे कोण पाहुणा आलाय् बघा तरी ! "

बिंदूच्या पाठोपाठ हेमचंद्र उत्सुकतेनें घरांत गेला. त्याबरोबर एक उंच गौरवर्ण व देखणा तरुण आंतून पुढें आला. हेमचंद्र क्षणभर गोंधळल्यासारखा त्याच्याकडे बघत राहिला. बिंदूला तर हंसें आवरेना. पण दुसऱ्या क्षणीं हेमचंद्राला त्या तरुणाची ओळख पटली आणि तो आनंदानें व अधीरतेनें म्हणाला, " अरे हा तर शरद्, कालीचा भाऊ ! कधीं रे आलास कलकत्त्याहून ? दहा वर्षांपूर्वीं कालीच्या लग्नांत मी तुला पाहिलं होतं. त्यावेळीं बरद्वानला तूं शाळेंत शिकत होतास. नाहीं ? तूं चांगला उंचापुरा झाला आहेस. मीं तुला क्षणभर ओळखलंच नाहीं. "

" कालीचं लग्न झाल्यानंतर बाबा वारले अन् मग आई माझ्याजवळ बरद्वानला रहायला आली. " तो तरुण सांगूं लागला, " मॅट्रिक झाल्यानंतर मग मी कलकत्त्याला शिकायला गेलों, अन् आई इथें तालपुष्करला आली. आतां उन्हाळ्याची सुटी आहे म्हणून मी इथें आईला भेटायला

आलोंय्. अन् हेमचंद्र, माझ्यांत बदल झाला आहे असं तूं म्हणतोस त्याप्रमाणें तुम्हां सर्वांतहि बदल झाला नाहीं का ? बिंदूताई माझ्याहून एकच वर्षानं मोठी आहे. लहानपणीं आमची फार मैत्री होती. छोट्या सुधाला कडेवर घेऊन आमच्याकडे येणारी ती खोडकर बिंदू आतां मारे दोन मुलांची आई झाली आहे अन् एवढं मोठं घर चालवते आहे आजीबाईसारखी ! ”

“ मला खोडकर म्हणूं नकोस हं उगीच ! ” बिंदू हंसत म्हणाली “ तूं काय कमी खोडकर होतास रे ? झाडावरच्या कैऱ्या कोण पाडीत होतं ? ”

“ मी कैऱ्या पाडत होतों खरा बिंदूताई — ” शरद् मिष्किलपणें बोलला, “ पण मला कैऱ्या पाडायचा आग्रह कोण करीत होतं बरं ? ”

असा त्यांचा थट्टाविनोद बराच वेळ चालला. मग सुधेकडे वळून हेमचंद्र तिला म्हणाला, “ काय सुधा, हा शरद् आठवतो का तुला ? कीं विसरून गेलीस ? ”

सुधेनें त्या उंच देखण्या तरुणाच्या सौम्य मुद्रेकडे क्षणभर न्याहाळून पाहिलें आणि मग हा आपला बाळमित्र होता या कल्पनेनें तिची चर्या सलज्ज व आरक्त झाली.

सर्वांचीं जेवणें आटोपलीं होतीं. हेमचंद्र उमाकडून फराळ करून आला असल्यामुळें त्याला जेवायचें नव्हतेंच. तेव्हां बिंदूनें आपलें जेवण उरकून घेतलें आणि मग ते सर्व जण पुन्हां गप्पा मारीत बसले. फार दिवसांनीं भेटीगांठी झाल्यामुळें त्याना गप्पासाठीं विषयाची वाण मुळींच पडली नाहीं. जरा वेळानें शरद् हेमचंद्राला म्हणाला, “ हेम, तुझ्यासारख्या हुषार माणसानं या खेड्यांत माशा मारीत बसावं हें मला मुळींच पसंत नाहीं. तूं कलकत्त्याला चल माझ्याबरोबर. तिथें तुझ्या

गुणाचं योग्य तें चीज होईल. नाहीं तर काय तूं सारा जन्म या खेडयांतच काढणार ? ”

हेमचंद्र गंभीरपणें म्हणाला, “ तूं म्हणतोस तें खरं शरद्. पण इथलं बिऱ्हाड मोडून कलकत्त्याला यायला आमच्याजवळ एवढा पैसा कुठें आहे ? शिवाय कलकत्त्याला हुषार, गुणी, शिकलेल्या माणसांचा काय तोटा लागून गेला आहे ? तिथें माझ्यासारख्या खेडवळ अर्धवटाला कोण विचारतो ? ”

“ असं कां म्हणतोस तूं ? ” शरद् आवेशानें म्हणाला, “ कलकत्ता शहरांत कितीहि हुषार माणसं असेनात ! तुझ्या हुषारीचं तिथं चीज झाल्याखेरीज रहाणार नाहीं असं मला अगदीं खात्रीनं वाटतं. शिवाय खर्चाची फिकीर तूं कशाला करतोस ? माझ्याच बिऱ्हाडीं येऊन रहा ना तुम्ही ? मी कांहीं कुणी परका का आहे ? ”

“ तूं आम्हाला परका नाहींस शरद्-पण तरी सुद्धां कलकत्त्याला यायचेंच झालें तर मग तेथें स्वतंत्र बिऱ्हाड करणेंच आम्हाला अधिक सोयीचें पडेल. तुझ्या घरीं राहून तुझ्या अभ्यासांत आम्हीं व्यत्यय आणणं बरं नाहीं. कलकत्त्याला यावं अशी जी तुझी सूचना आहे ती मात्र विचार करण्याजोगी आहे. मलाहि हल्लीं वाटूं लागलंय् कीं चार दिवस कुठेंतरी दुसरीकडं जावं ! ”

त्यानंतर कांहीं वेळानें किंचित् थट्टेच्या स्वरांत बिंदू शरद्ला म्हणाली, “ काय शरद्, आतां आम्हांला लग्नाची मेजवानी कधीं देणार ? तुझी आई तुझ्यासाठीं एकादी छानदार नवरी शोधीत असेलच म्हणा ! नाहीं का ? ”

“ आईपेक्षां काली ताईलाच माझ्या लग्नाची अधिक घाई झाली आहे-” शरद् म्हणाला, “ बाकी मी स्वतःतर बी. ए. होऊन पैसे मिळवूं लागल्याखेरीज लग्नाचा विचारच करायचा नाहीं असं ठरवलंय्. ”

कालीच्या आठवणीनें बिंदूचें हृदय गंहिवरून आलें. " माझी लाडकी मैत्रीण काली ! किती दिवसांत तिची माझी गांठभेट नाहीं." ती किंचित खेदानें म्हणाली, " लहाणपणीं मी, उमा अन् काली अगदीं जिवाभावाच्या मैत्रिणी होतों. पण आतां सहा सहा महिन्यांत आम्हांला एकमेकींचं दर्शन घडत नाहीं."

" उद्यां संध्याकाळीं काली उमाकडे जाणार आहे." शरदूनें माहिती दिली. " तेव्हा तूंहि जाशील तिकडे तर तुमची आयतीच गांठ पडेल बिंदू."

नंतर मग कालीवरूनच बोलणें निघालें. शरदूची वहिण काली ही एका कुलीन पण अत्यंत सनातनी मतांच्या जशा भल्या मोठ्या कुटुंबांत पडली होती. तिचा नवरा तिच्याहून वीस वर्षांनीं मोठा होता. आणि तो नेहमीं आजारीहि असे. विचारी काली अत्यंत भक्तिभावानें आपल्या पतीची सेवा करी आणि सोशिक वृत्तीनें साऱ्या कुटुंबाच्या कामाचा भार उचलीत असे.

जवळ जवळ दोन वाजेपर्यंत गप्पा झाल्यानंतर मग शरदू घरीं जावयासाठीं उठला. बिंदूचा आणि हेमचंद्राचा निरोप घेतांना तो म्हणाला, " इथें आहे तोंवर रोज मीं बिंदूताईच्या हातचा सुंदर मुरंब्याचा आणि तुमच्या गोड गप्पांचा आस्वाद घ्यायला येत जाईन." सुधा जवळच झोंपली होती. तिच्या कोमल गौर मुखावर चंद्राची धवल प्रभा पसरल्यामुळें तें पूर्ण उमललेल्या मोहक व सुगंधित पुष्पासारखें रमणीय दिसत होतें. तिच्या मुग्ध व सुंदर ओंठावर अव्याज स्मिताची माधुरी पसरली होती. त्या रात्रीं घरीं जातांना शरदूच्या मनांत आलें, " किती प्रेमळ आणि सुखी कुटुंब आहे हें ! या गरीब झोंपडींत जें समाधान नांदत आहे तें मोठमोठ्या महालांत आणि प्रासादांत क्वचितच पहायला मिळेल. हेमचंद्राचा प्रामाणिक निर्भय स्वभाव, बिंदूची शालीनता,

सुधेची बालकासारखी मुग्धता सारेंच किती गोड वाटतें ? या मंडळींच्या प्रेमाचा थोडाफार हिस्सा लाभण्याइतका मी भाग्यशाली असेन का ? "

म. ग्रं. सं ग्रा. वाचनालय शाखा.
दा. क्र. ३३८८ नों. दि ..............
वि. ...... क्र. ..................



दुसरे दिवशीं सायंकाळीं बिंदू आपल्या काकांच्या घरीं गेली. उमा आणि काली तेथें गप्प करीत बसल्या होत्या. बिंदूनें त्या दोघींना मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. बाळपणीं त्या तिघी एकत्र खेळलेल्या होत्या आणि आतां लग्नें होऊन त्या आपापल्या सासरीं नांदत असल्या तरी त्यांचें एकमेकींवरचें प्रेम यत्किंचितहि कमी झालेलें नव्हतें. बऱ्याच दिवसांनीं त्या तिघी आज एकत्र आल्यामुळें त्यांना अर्थातच अत्यंत आनंद झाला आणि बालपणाच्या मधूरस्मृतींची उजळणी करण्यांत, त्याचप्रमाणें आपापल्या सासरच्या हकिगती सांगण्यांत त्या अगदीं रंगून गेल्या.

काली वर्णानें श्यामल होती, तिचा चेहरा सुंदर होता. पण चिंतेमुळें आणि शोकामुळें त्यावर रेषा उमटल्या होत्या. तिचे डोळे खोल गेले होते. हातांत सोन्याच्या दोन बारीक बांगड्या व गळ्यांत सोन्याची सांखळी यांशिवाय दुसरे कोणतेहि अलंकार तिच्या अंगावर नव्हते. कालीचा स्वभाव एखाद्या बालकासारखा साधा आणि निष्पाप होता. संसारांतील सारीं दुःखें ती गरिबीनें आणि निमुटपणें सोशीत असे. तिचें सासर फारच सनातनी होतें. स्वैंपाकघरांत नोकरांना प्रवेश नसे. त्यामुळें घरांतील सुनेला पहांटेपासून तों रात्रीपर्यंत सारें घरकाम उरकावें लागे. त्यांच्या घरीं पाहुण्यारावळ्यांची सारखी वर्दळ असे. आणि कालीच्या

सासूची शिस्त फारच कडक होती. त्यामुळें सारें काम यंत्रासारखें व्यवस्थित चाले.

उमेचें घर याहून अगदीं निराळें होतें. तिचें सासर फारच धनाढ्य होतें. शिवाय बऱ्याच आधुनिक चालीरीतींचा तेथें शिरकाव झालेला होता. कालीप्रमाणें सनातनी घरांत आपण पडलों असतों तर आपली तेथें फारच कुचंबणा झाली असती असें क्षणभर उमेच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं. एकत्र कुटुंबपद्धतीच्या फायद्यांची तिला अजून जाणीव झालेले नव्हती.

कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर काली उमेला म्हणाली, " तुझे यजमान कायसे कलकत्त्याला गेले आहेत म्हणे. होय ना. "

" होय. " क्षणभर थांबून उमा म्हणाली, " गेले बारा महिने कलकत्त्यालाच आहेत आणि मलाहि लौकरच ते कलकत्त्याला घेऊन जाणार आहेत. "

" माझा भाऊ शरद् सांगत होता." काली पुढें म्हणाली, " कीं तुझ्या पतिराजांनीं कलकत्त्याच्या एका भव्य रस्त्यावर एक सुंदर घर खरेदी केलं आहे आणि भारी भारी फर्निचरनं तें सजवलं आहे. त्यांच्या गाडीचे घोडे तर असे उमदे आहेत कीं राजवाड्यांत देखील तसे पाहायला मिळणार नाहींत म्हणे ! त्याचप्रमाणें शरद् असंहि म्हणत होता कीं तुझे यजमान आतां कलकत्त्याबाहेरच्या उपनगरांत, भोंवतीं फळबागा, फुलबागा, कारंजीं असलेला आणि आंत संगमरवरी जमीन घातलेला असा सुंदर बंगला लौकरच खरेदी करणार आहेत. थाट आहे बाई तुझा उमा ! "

उमेच्या ओंठावर एक क्षीण हास्यरेखा उमटून गेली. आणि नंतर लगेच तिच्या त्या विशाल तेजस्वी नेत्रांत विषण्णतेची दाट छाया

पसरली. ती हळूंच म्हणाली, " उमदे घोडे, संगमरवरी जमिनी, आणि सुंदर बगीचे यांनीं जर माणूस सुखी होत असेल तर मग माझा थाट आहे खरा म्हणायचा ! पण या नशिबांत काय लिहिलं दैवानं तें कुणी सांगावं !" येवढें बोलून तिनें एक दीर्घ उसासा टाकला.

बिंदू चटकन् म्हणाली, " असं कां बोलतेस उमा ? तुझ्या नशिबांत भरपूर सुखाखेरीज दैवानें दुसरें काय लिहिलेलें असणार बरें ?"

त्यावर क्षणभर थांबून उमा म्हणाली, "तुला आठवतें कां बिंदू, आपण लहान होतों तेव्हां हात पाहून भविष्य सांगणारा एक वैरागी गांवांत आला होता नि आपण तिघांनीं त्याला आपले हात दाखविले होते. कालीचा हात पाहून त्यानं सांगितलं होतं कीं ही मुलगी एका खूप मोठ्या व सनातनी घराण्यांत पडेल."

" अगबाई !" बिंदू उद्गारली, " अन् माझं भविष्य त्यानं काय सांगितलं होतं ?"

" तुला त्यानं सांगितलं होतं कीं, तुला संपत्ति अगर वैभव कांहींच प्राप्त होणार नाहीं. तूं गरीब माणसाचा संसार सजवशील अन् गरिबीची मीठभाकरी खाऊन रहाशील !"

" त्याचं भविष्य अगदीं खरं ठरलं अन् मला त्यांत पूर्ण समाधान वाटतंय्." बिंदू संतुष्ट वृत्तीनें हंसत हंसत बोलली. " बरं पण उमा, तुझं भविष्य त्यानं काय वर्तवलं होतं ?"

" माझा हात त्यानं बराच वेळ बारकाईनं न्याहाळून पाहिला होता आणि मग तो मला म्हणाला होता-" उमा सांगूं लागली, " मुली, तूं खूप श्रीमंत घराण्यांत पडशील. आणि निव्वळ पैशानं माणसाला सुख लाभत असेल तर तूं खूप सुखीहि होशील. पण लक्षांत ठेव, तुझे ग्रह फार खडतर आहेत बरे ! त्याचे शब्द ऐकल्याबरोबर भीतीनें आणि

विस्मयानं मी जागच्या जागीं खिळून उभी राहिलं होतें!" बोलतां बोलतां उमेच्या सर्वांगांतून शहारा आला.

बिंदू चटकन् उमेच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली, "कुडमुड्या ज्योतिषानं सांगितलेलं भविष्य तें, त्यावर कसला विश्वास ठेवतेस वेड्या-सारखी तूं! अन् उमा तुझ्यासारख्या पैसेवाल्यांनींच जर आयुष्याबद्दल अशी तक्रार करायला प्रारंभ केला तर मग आम्हीं गरिबांनीं काय म्हणावं बरं!"

साडीच्या पदरानें डोळे पुशीत उमा म्हणाली, "मी तक्रार वगैरे कांहीं करीत नाहीं. अन् त्या भविष्यालाहि मी फारसं महत्त्व देत नाहीं. पण काय असेल तें असो, बिंदू, कलकत्त्याला यजमानांच्या बरोबर जाऊन रहायचा विचार मनांत आला कीं कसली तरी चमत्कारिक भीति भुंग्याप्रमाणें माझं अंतःकरण कोरूं लागते. आतां तूं तर कलकत्त्याला येणार म्हणतें आहेस. अन् काली पण बरद्वानला म्हणजे जवळच आहे. लहानपणीं आपण तिघीजणी सख्ख्या बहिणीसारख्या प्रेमानं अन् खेळीमेळीनं एकत्र वाढलों. आतां मोठेपणीं तिघींपैकीं एकादीवर जर कांहीं संकट कोसळलं तर निदान दुसऱ्या दोघींच्या प्रेमाचा तरी तिला आधार मिळावा. दुसरं काय?"

उमेच्या स्वरांत असें कांहीं तरी होतें कीं ज्यामुळें कालीचें आणि बिंदूचं हृदय चरकून गेलें. बरीच रात्र झाल्यावर त्या दोघीजणी उमेचा निरोप घेऊन आपापल्या घरीं जावयास निघाल्या तेव्हां भावी अशुभाच्या अमंगळ छायेनें त्यांचीं अंतःकरणें काळवंडून गेलीं होतीं!

# आई आणि मुलगा

६

कलकत्त्याहून मुंबईला जाणारी मेलगाडी दुपारच्या वेळीं मोगलसराई स्टेशनवर येऊन पोंहोचली. बनारसला जाण्यासाठीं येथून गाडी बदलावी लागे. त्यामुळें बनारसला जाऊं इच्छिणाऱ्या यात्रेकरूंचा लोंढाच्या लोंढा तींतून खालीं उतरला. येथून रेल्वेचा एक फांटा गंगेच्या किनाऱ्या किनाऱ्यानें जात असे आणि मग गाडींतून उतरून व होडीनें ओलांडून प्रवासी पलीकडे असलेल्या बनारस शहरीं जाऊन पोंहोचत. कारण गंगेवरचा पूल त्या वेळीं बांधलेला नव्हता.

या प्रवाशांमध्यें शरद् व त्याची आई हे दोघेजण होते. मोगलसराईला गाडी बदलून आतां ते गंगाकिनारीं येऊन पोहोंचले होते. शरद्ची आई अगदीं कर्मठ सनातनी असल्यामुळें गाडीच्या प्रवासाच्या चोवीस तासांत तिनें अन्नाचा एक घास किंवा पाण्याचा एक थेंब तोंडांत टाकला नव्हता. प्रवाशांकरतां बांधलेल्या एका धर्मशाळेंत शरद् व त्याची आई उतरले. शरद्नें आईकरतां थोडसें फराळाचें सामान विकत आणलें. आतां सायंकाळ होत आली होती. आकाश मेघांनीं व्यापलें होतें व विजा चमकत होत्या. तेव्हां नदी ओलांडावयासाठीं सकाळपर्यंत थांबण्याचें शरद्नें ठरवलें.

अरुणोदयाची तांबूस छटा पूर्वक्षितिजावर पसरण्याच्या आंतच शरद्च्या आईनें आपलीं प्रातःकर्में उरकलीं आणि मग दोन तास तिनें पूजाअर्चा केली. नंतर तीं मायलेकरें धर्मशाळेच्या बाहेर पडून नदी-

कांठानें फिरत फिरत चालली. त्यावेळीं सूर्योदय नुकताच झाला होता. गंगेच्या भव्य पात्रावर त्याचीं सोनेरी किरणें रेशमी महावस्त्राप्रमाणें तळपत होतीं. पैलतीरावर पुरातन अशा काशी नगरींतील पवित्र मंदिरें, उत्तुंग प्रासाद, प्रवाहाला बांधलेले विस्तीर्ण घाट या सर्वांवर सूर्यकिरणाचें सुवर्णजाल पसरून त्यांची शोभा अप्रतिम दिसत होती.

पैलतीरावरून बनारस शहराचें जें वैभव दिसतें तें केवळ अवर्णनीय आहे. देवालयांचे सोनेरी कळस आकाशाच्या निळ्या पार्श्वभूमीवर दिमाखांत तळपतात. घाटावर स्नान करावयास आलेल्या भाविक जनांची एकच गर्दी उसळलेली असते आणि तीरावरील प्रचंड जुन्या इमारतींना आणि घाटांना प्रक्षाळीत गंगेचा विस्तीर्ण प्रवाह आंदोलत असतो. हें हृदयंगम चित्र एकदां पाहिल्यावर मनुष्य तें पुन्हां कधींहि विसरत नाहीं. आज देखील हें चित्र रोजच्या इतक्याच सौंदर्यानें नटलेलें होतें. कळस तळपत होते, लोकांची गर्दी उसळलेली होती, शेंकडों तांबड्या पांढऱ्या पताका फडफडत होत्या. घंटांचे आणि शंखांचे आवाज वातावरणांत भरले होते.

शरद्‌ची आई ही एका कर्मठ सनातनी घराण्यांतली वृद्ध विधवा स्त्री होती. संसारांतील सारे मायापाश तोडून उरलेलें आयुष्य श्रीकाशिविश्वेश्वराच्या पायाशीं सेवा करीत राहून घालवण्याच्या हेतूनें ती बनारसला आलेली होती. अर्थात् हा पवित्र आणि उदात्त देखावा पाहून तिचें हृदय आनंदानें भरून आलें असल्यास आणि आपल्या डोळ्याचें पारणें फिटल्यासारखें तिला वाटत असल्यास त्यांत नवल काय ? तिनें भक्तिभावानें हात जोडले, मस्तक नम्र केलें आणि तिच्या डोळ्यांतून आनंदाचीं आसवें घळघळां वाहूं लागलीं.

शरद्‌लाहि गंगेचे आणि तीरावरील मंदिरांचें दर्शन होतांच गहिंवरून आलें. गेल्या तीन हजार वर्षांतल्या हिंदू कला, धर्म आणि संस्कृति यांचे

अधिष्ठानच आपण बघत आहोंत कीं काय असें त्याला क्षणभर वाटलें

नंतर एका लहानशा होडीनें गंगा नदी पार करून शरद् व त्याची आई श्री विश्वेश्वराच्या मंदिरांत गेले. मंदिराच्या गाभाऱ्यांत समयांचा मंद प्रकाश अंधाराला उजळीत होता. एक पुजारी संस्कृत मंत्र म्हणत होता. उदबत्त्यांचा व फुलांचा गंध सर्वत्र दरवळत होता. मंत्र म्हणून झाल्या-बरोबर मंदिरांतल्या घंटा घणघणूं लागल्या आणि सर्व भक्तांनीं आपलीं मस्तकें आदरपूर्वक नमवून विश्वेश्वराला वंदन केलें. विश्वेश्वराच्या दर्शना-नंतर गांवांतलीं इतरहि मंदिरें शरद्नें आपल्या आईस दाखविलीं. तीन दिवस शरद् आईबरोबर बनारसला राहिला. दररोज त्याची आई विश्वे-श्वराच्या मंदिरांत दर्शनाला व पूजेला जाई. तिसरा दिवस उजाडला. आज शरद् परतणार होता व त्याची आई मात्र विश्वेश्वराच्या चरणांजवळ येथून पुढें आपलें जीवन सेवेंत घालवणार होती.

त्या दिवशीं सकाळींच मायलेकरें मंदिरांत आलीं. मंदिरांतील घंटा वाजूं लागल्या तसें शरद्च्या आईचें हृदय भरून आलें. जड अंतःकर-णानें मुलांचे मायापाश तोडावयास ती सिद्ध झाली. तिच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागले. ती मनांतल्या मनांत परमेश्वराची प्रार्थना करूं लागली.

" देवा, मला धैर्य दे. हे मायापाश तोडणें कठीण जात आहे. विश्वे-श्वरा, मला तुझ्या सेवेला लावून घे आणि माझ्या या एकुलत्या एका लेकराला तुझ्या कृपेची पांखर घाल. "

शरद्लाहि गहिंवरून आलें. त्यानें खालीं वांकून आईचे पाय धरले. त्यावर त्याला उचलून पोटाशीं धरीत सद्गत स्वरानें त्याची आई म्हणाली, " बाळा, वाडवडिलांच्या कीर्तीला स्मरून सत्यानें व न्यायानें वर्तन कर. वहिणीला जीव लाव. हेम, बिंदू, सुधा यांना मायेनें वागव, मला म्हाता-

रीला आतां देवाच्या पायांजवळ हें उरलें सुरलें आयुष्य सेवेंत घालवूं दे. जा बाळ. सुखांत ऐस. परमेश्वर तुझें कल्याण करो."

पुढें तिला बोलवेना. तिचा कंठ दाटून आला. शरद् तर हुंदके देऊन रडूं लागला. त्याच्या आईनें त्याच्या तोंडावरून हात फिरवला. तिच्या पायाची धूळ मस्तकीं धारण करून आणि विश्वेश्वराला वंदन करून शरद् माघारीं फिरला व होडींत जाऊन बसला.

ती होडी प्रवाहाच्या पृष्ठावरून दिसेनाशी होईपर्यंत शरद्ची आई आसूं भरल्या डोळ्यांनीं तिजकडे टक लावून पहात होती. होडी अजिबात दिसत नाहींशीं झाल्यानंतर जड पावलांनीं आणि दु:खित अंत:-करणानें ती मागें वळली व मंदिरात येऊन श्री विश्वेश्वराची प्रार्थना करूं लागली.

" सुधा, सुधा ! "

" काय ताई ? "

" ही साडी मी धुतली आहे तेवढी छपरावर वाळायला घाल बरं. मी विहिरीवर स्नान करून येतें आणि मग चूल पेटवतें. कारण आतां दूधवाली दूध घेऊन येईल. मला विहिरीवर आंघोळ करायला कससंच वाटतं बाई ! आपलं तालपुष्कर त्या मानानें किती छान होतं ! कुणीहि केव्हांहि तळ्यावर जावं नि खुशाल आंत उतरून स्नान करावं. कसला संकोच वाटत नसे तिथें ! "

बिंदूचें हें बोलणें ऐकून सुधा हंसत हंसत म्हणाली, " तुला किनई ताई, या कलकत्त्यांतील कुठलीच गोष्ट आवडत नाहींसं दिसतंय्. पण मला तर बाई हें शहर भारी आवडलं. केवढं भव्य आणि सुंदर आहे हें ! मोठमोठे बाजार काय, दुकानं काय, घरं काय, माणसांची गर्दी काय नि घोडे गाड्या काय ! बाई बाई, माझे तर डोळे दिपून जातात. आपल्या तालपुष्करला यांतलं कांहीं तरी पहायला सांपडतं का ताई ? "

" पुरें झालं या कलकत्त्याचं कौतुक." बिंदू झटकन् म्हणाली, " आपलं तालपुष्कर गरीब खेडं असलं तरी आपला तो स्वर्गच आहे बरं सुधा ! तिथं सूर्यप्रकाश अन् मोकळी हवा भरपूर मिळत होती. भाज्या, फळं, दूध-दुभतं, मासळी, आंबे तिथं लयलूट होती इथं त्यांतलं कांहीं तरी आहे

कां ? गाड्या, घोडे, बाजार दुकानं हें श्रीमंतांसाठीं ठीक आहे, पण आपणासारख्या गरिबांना त्याचा उपयोग काय ? हें घर बघ किती लहानसं नी कोंदट आहे ? इथें धड उजेड येत नाहीं कीं हवेची झुळूक नाहीं. जरा कुठें कुणाकडे बसायला जायचं असेल तर पडदे लावलेल्या पालखींतून जावं लागतं. खरोखर, पिंजऱ्यांत अडकलेल्या पांखरासारखा माझा जीव इथें गुदमरतो आहे."

" पण ताई, इथें किती मजा आहे. परवां शरद्नं आपल्याला म्युझियम पाहायला नेलं होतं. तेव्हां गार्डींतून जातांना किती मौज वाटली, अन् त्या बागेंत किती सुंदर प्राणी, पक्षी, फुलझाडं होतीं!" सुधा उत्साहानें सांगू लागली. पण तिला मध्येंच थांबवून बिंदू म्हणाली, " आपल्या तालपुष्करला मुळीं गार्डींतून हिंडायची जरूरच पडत नसे. मनाला वाटेल तेव्हां खुशाल तळ्यावर जावं. फिरणंहि होई अन् चार ओळखीचीं माणसंहि भेटत. इथें ना कुणाची ओळख ना देख! कुणाशीं परिचय करून घ्यावा म्हटलं तर ते श्रीमंत अन् आपण गरीब. मग कशी ओळख होणार?"

" पण ताई " सुधा म्हणाली, " शरद् तर आपल्या चांगला ओळखीचा आहे ना इथें! तो किती मजेमजेच्या गोष्टी मला सांगतो अन् पुस्तकांतून वाचूनहि दाखवतो. मला तर त्याचं बोलणं एकसारखं ऐकतच रहावंसं वाटतं ग!"

" शरद्ची गोष्ट निराळी आहे सुधा." बिंदू गंभीरपणें म्हणाली, " त्याच्यासारखीं सज्जन अन् गोड मुलं क्वचित् सांपडतात. एवढा श्रीमंत नि शिकलेला पण त्याला आपल्या संपत्तीचा किंवा शिक्षणाचा काडीमात्र गर्व नाहीं. भारी उदार अन् प्रेमळ अंतःकरणाचा मुलगा आहे तो!"

तेवढ्यांत दूधवाली आल्यामुळें बहिणीबहिणींचें हें संभाषण थांबलें. दूधवाली जवळचें दूध व दहीं चांगलें नसल्याची व शिवाय तें महाग असल्याची तक्रार बिंदूनें केली. कलकत्त्याला सर्वंच वस्तु अशाच मिळत.

भाजी, मासळी, दूध, या गोष्टी तालपुष्करला किती सुंदर व स्वस्त मिळावयाच्या! दूध घेतल्यानंतर बिंदू स्नान करून स्वयंपाकाला लागली व सुधा तिला मदत करूं लागली.

तालपुष्कर सोडून हेमचंद्र कलकत्त्याला रहावयास आला होता. शरद्‌चा 'आपणाकडेच उतरावें' हा आग्रह मोडून हेमनें एक लहानसें घर भाड्यानें घेऊन स्वतंत्रच बिऱ्हाड थाटलें होतें व आता तो नोकरीच्या शोधांत होता.

बिंदूप्रमाणेंच हेमलाहि कलकत्त्याचें वातावरण आवडत नव्हतें. त्याला तालपुष्करची पुन्हां पुन्हां आठवण येई. कलकत्त्यामधलें धांवपळीचें आणि झगमगाटाचें जीवन पाहून त्याला गोंधळल्यासारखें होई. मोठमोठ्या डिनर आणि गार्डन पार्ट्या, नाचगाणीं, बैठकी, व्याख्यानें आणि श्रीमंत व बड्या लोकांचे नानाविध उद्योग बघतां बघतां त्याच्या मेंदूला जणूं भोंवळ येत असे. या सर्व धामधुमीपासून तो स्वतः कटाक्षानें अलिप्त राही. दिवसभर नोकरीच्या शोधार्थ भटकून तो घरीं आला म्हणजे जेवणानंतर रात्रीं तो व बिंदू दिव्याच्या मंद प्रकाशांत तालपुष्करच्या स्मृति काढून बोलत बसत. सर्व दिवसाकाठीं तेवढा काळ हेमला सुखकर वाटे.

बहुधा प्रत्येक दिवशीं सायंकाळीं हेमकडे शरद्‌ची एक फेरी होई. बिंदूहि आपलीं कामें उरकून गप्पांत सामील होई. चटई अंथरलेली असे. दिव्याचा पिवळा उजेड अंधाराला उजळीत राही. आणि अशा वेळीं त्या सर्वांच्या गुजगोष्टी चालत. शरद् हा एक उत्साही आणि ध्येयनिष्ठ बंगाली तरुण होता. आपल्या राष्ट्रासाठीं कांहीं तरी भव्य, दिव्य, उज्ज्वल कृत्य करावें अशी त्याची आकांक्षा होती. पाश्चात्य शिक्षणामुळें त्याची बुद्धि तल्लख आणि मन सुसंस्कृत झालें होतें. बंगालमध्यें येऊन गेलेल्या अनेक थोर व कर्तृत्ववान् पुरुषांबद्दल त्याला मोठा

अभिमान वाटे. प्रसिद्ध सुधारक विद्यासागर आणि अक्षयकुमार, दयानंद सरस्वति आणि राममोहन रॉय, विख्यात लेखक बंकिमचंद्र चतर्जी आणि मधुसूदन या नररत्नांविषयीं बोलतांना त्यांचें हृदय अभिमानानें उचंबळून येई आणि त्याच्या शब्दांना वेगळेंच तेज चढे.

हेम आणि बिंदु शरदूच्या आवेशयुक्त मुखाकडे मोठ्या कौतुकानें बघत. जवळच एका कोपऱ्यामध्यें दुसरा एक अत्यंत उत्सुक श्रोता बसलेला असे. हा म्हणजे सुधा. जेवण आणि झोंप विसरून शरदूचें बोलणें ती तन्मयतेनें ऐकत राही. उत्सहानें तळपणाऱ्या त्याच्या चेहऱ्याकडे ती टक लावून बघत असे. आणि रात्रींच्या प्रहरीं झोपेंत सुद्धां शरदूचा तो गंभीर आणि मृदु स्वर तिच्या कानांत घुमत राही !



राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ३८५१२
विभाग बी.वा.
क्रमांक ३१६२
नों. दि. १५।१२।१६
... शाखा.

## प्रेमाचा उदय



दिवसांमागून दिवस जाऊं लागले तसतशी शरद्‌च्या डोळ्यांपुढें एक नवीन व सुंदर सृष्टि उमलली. तो अतिशय अभ्यासू विद्यार्थी होता. त्याचा स्वभाव बराचसा एकलकोंडा व अबोल होता. आणि त्याच्या वृत्तींत उदासीनतेची गडद छाया होती. सायंकाळच्या वेळीं आपल्या खोलीमध्यें फेऱ्या घालीत इंग्रजी कविता वाचणें हा त्याचा आवडता छंद होता. आपल्या स्वतःच्या अशा एका वेगळ्याच कल्पनासृष्टींत तो राही आणि तेथें आपल्या भावी आकांक्षांचीं गूढ रमणीय स्वप्नें बघण्यांत याचें मन रंगून जाई.

परंतु हेम कलकत्याला रहायला आल्यापासून मात्र शरद्‌च्या स्वभावांत दिवसेंदिवस फरक पडत चालला. दररोज सायंकाळीं हेमकडे जाणें आणि तेथें भरपूर गप्पा करून रात्रीं एक दीड वाजतां आपल्या खोलीवर परतणें हें त्याचें नित्यकर्म होऊन बसलें. प्रारंभीं त्याला वाटे, शुद्ध मैत्रीच्या भावनेनेंच आपण हेमकडे जात आहोंत. पण पुढें पुढें हेमच्या घराविषयीं आपणांस जी ओढ वाटते ती केवळ विशुद्ध स्नेहभावनेची नाहीं तर तिचें स्वरूप अधिक सूक्ष्म, अधिक कोमल व नाजुक आहे हें त्याच्या ध्यानांत आलें. त्याच्या हृदयांत कांहीं नवे व अनोळखी भाव जागृत होत होते. त्याच्या छातींत एक नवीन धडधड सुरूं झाली होती. अभ्यासाचीं रुक्ष पुस्तकें वाचतांना एक स्निग्ध मधुर आणि मंजुळ स्वर

आपल्या कानांत घुमत आहे असें वाटून तो बेचैन होई. त्याच्या वृत्तींत हें नवें चैतन्य, ही नवी अवस्थता सुधेनें निर्माण केली होती. होय सुधेचें आकर्षण त्याच्या मनावर प्रभाव गाजवीत होतें.

रात्र झाली होती. स्वच्छ निळ्या आकाशांत लक्षावधि तारे हिऱ्या-सारखे चमकत होते. 'वाऱ्याच्या मंद मंद झुळका वाहत होत्या. हवेंत गोड गारवा भरला होता. हेम अद्याप घरीं आला नव्हता. विंदू स्वैंपाक-घरांत कामांत होती. सुधा आणि शरद् घराच्या गच्चींत उभे होते. चहूंकडे पूर्ण शांतता पसरली होती. आकाशांतील तेजस्वी चांदण्याकडे सुधा टक लावून बघत होती. तिचे डोळे चमकत होते. मधूनच तिचे कुरळे केस जवळ उभ्या असलेल्या शरद्च्या गालाला स्पर्श करीत आणि मग त्याचें मन बेहोष होई.

शरद् रोज सुधेला आकाशांतील निरनिराळ्या ग्रहनक्षत्रांची माहिती सांगत असे. पण आज तो अगदीं स्तब्ध उभा होता. त्याची ती स्तब्धता चमत्कारिक वाटून सुधा म्हणाली, " शरद् , आज तुम्ही असे गप्प कां? आज या ताऱ्यांविषयीं आणि ग्रहांविषयीं तुम्ही कांहींच माहिती सांगत नाहीं ! "

शरद जणूं एकदम स्वप्नांतून जागा झाल्याप्रमाणें म्हणाला, " मी—मी आज ताऱ्यांचा विचार करीत नव्हतों सुधा. "

" मग कसला विचार चालला होता?" भाबड्या सुधेनें प्रश्न केला.

" मी या पृथ्वीवरचा, पृथ्वीवरच्या एका लहानशा घराचा विचार करीत होतो " शरद हळूच म्हणाला.

" म्हणजे तुमचं तालपुष्करचं घर ना ? " सुधा म्हणाली, " खरंच तिथं तुमची आई अन् कालीताई असतात, नव्हे का ? "

" तें घर मला प्रिय आहेच सुधा, " शरद् म्हणाला, " पण आतां

मी त्यासंबंधीं विचार करीत नव्हतों. मी माझे स्वत:चें घर कधीं होईल याचा विचार करीत होतों !"

सुधा क्षणभर स्तब्ध राहिली. मग ती हलकेंच म्हणाली, "माझ्या लक्षांत आलं तुम्ही काय म्हणतां तें. पण शरद्, तुमचं भवितव्य फार उज्ज्वल आहे. आत्तां लौकरच तुमचं लग्न होईल अन् मग आपोआपच तुमचं घर होईल. आम्ही मग आमच्या वहिनींना बघायला तुमच्या घरीं वरचेवर येत जाऊं. खरेंच, तुमची पत्नी होईल ती स्त्री किती भाग्याची !"

शरद्‌ला तिचें तें सरळ आणि निष्कपट बोलणें अधिक ऐकवेना. त्यानें झटकन् आपली मान बाजूला वळवली. क्षणभरानें आपला हात त्यानें हलकेच सुधेच्या हातावर ठेवला. सुधा प्रांजलपणें म्हणाली, "तुमचा हात येवढा थंड कां लागतो आहे ? शरद्, माझा राग आला का तुम्हांला ? मी कांहीं भलतें सलतें तर बोलून गेलें नाहीं ना ? तुमच्या मनाला कसली चिंता लागलेली आहे का ?"

त्या क्षणीं शरद्‌च्या हृदयांत असंख्य भावना उचंबळून आल्या. त्याला वाटलें, मनांत जें जें कांहीं दाटून राहिलें आहे तें सारें सारें सुधेला सांगून टाकावें. क्षणभर त्याच्या ओंठापर्यंत शब्द आले. तेवढ्यांत जिन्यांत कुणाचीं तरी पावलें वाजलीं !

हेम घरीं परत आला होता. विंदूहि त्याच वेळीं स्वयंपाक घरांतून तेथें आली. गच्चीवर उभ्या असलेल्या शरद्–सुधाकडे पाहून थट्टेनें ती हेमला म्हणाली, "पाहिले का हे दोन वेडे ? आभाळांतल्या चांदण्या बघतां बघतां जेवणाखाण्याचा देखील विसर पडलाय् यांना !"

शरद्‌ला एकदम ओशाळल्यासारखें झालें, त्याच्या सर्वांगाचा थरकाप झाला. सुधाजवळ आपण भलतेंच कांहीं बोलून गेलों नाहीं, याबद्दल मनांतल्या मनांत त्यानें देवाचे आभार मानले आणि मग तो शांतपणें

बिंदूला म्हणाला, "होय बिंदू, आभाळांतल्या चांदण्या बघण्यांत अन् इतर हि बराचसा मूर्खपणा करण्यांत फार दिवस घालवले मी. पण आतां यापुढें मी असा वेळ दडवतां कामा नये. परीक्षा जवळ आली आहे. मला आतां पूर्वीसारखं दररोज तुमच्या घरीं येतां येणार नाहीं. यापुढें केव्हां तरी आठदहा दिवसांनीं येत जाईन मी." आणि अधिक कांहीं न बोलतां सुधाकडे एक चोरटा कटाक्ष टाकून तो तेथून चालता झाला.

त्या दिवशीं रात्रीं जेवण झाल्यावर हेमचंद्र रोजच्याप्रमाणें फिरावयाला घराबाहेर पडला. कलकत्त्याच्या उपनगरांचे रस्ते शुभ्र चंद्रप्रकाशांत न्हाऊन निघाले होते, भवानीपूरचा विभाग ओलांडून बालीगंज विभागांत हेम शिरला, तेव्हां विद्युद्दीपांनीं झममगणाऱ्या एका सुंदर बंगल्यानें त्याचें लक्ष वेधून घेतलें. बंगल्याभोंवतीं मोटा बगीचा होता. तेवढ्यांत सुंदर व ऐटबाज घोडयांची जोडी असलेल्या अशा दोन मोठ्या गाडया एकामागें एक त्या बंगल्यासमोर येऊन उभ्या राहिल्या. मागच्या गाडीमधून स्त्रियांचा हास्यध्वनि हेमच्या कानांवर आला.

त्यानें दरवानाजवळ कुतूहलानें चौकशी केली तेव्हां धनपूरचे नबाब धनंजय यांचा तो वाडा असल्याचें हेमला कळलें. इतकेंच नव्हें तर कलकत्त्यांतील एका सुप्रसिद्ध नर्तकीचा आज तेथें नाच होणार असल्याचेंहि त्यानें हेमला सांगितलें. हेमच्या मस्तकांवर जणू वज्राघात झाला. त्याच्या डोळ्यांतून कढत अश्रू सांडूं लागले. "गरीब बिचारी उमा! तुझ्या नशीबीं काय वाढून ठेवलें आहे कोण जाणें!" एक हुंदका देऊन पुटपुटला.

धनंजयाची आणि हेमची ओळख होती. त्या ओळखीच्या जोरावर धनंजयाला दोन गोष्टी सांगून या चंगीभंगीपणापासून त्याचें मन परावृत्त करावें या हेतूनें हेमनें वाड्यांत शिरकाव करून घेतला व धनंजयाची भेट घेतली. धनंजयनें हेमचें प्रेमानें स्वागत केलें. पण त्याच्या भोंवतींचें

मित्रांचे कडें व त्याचें एकंदर वैभव पाहून हेम दिपून गेला. सारे मित्र धनंजयचे स्तुतिपाठक होते व त्याच्यापुढें गोंडा घोंळीत होते. अशा परिस्थितींत शहाणपणाच्या दोन गोष्टी धनंजयाला सांगावयाचें धाडस केलें तर आपणच मूर्ख ठरूं असें हेमला भय वाटलें. त्यांतून एकदोनदां त्यानें तसा प्रयत्न करून पाहिला, पण त्याबरोर धनंजयाच्या वृत्तींत एकदम परकेपणा व तुटकपणा दिसूं लागला. हेमनें काय ओळखायचें तें ओळखलें व खिन्न मनानें तो त्या वाड्याबाहेर पडला.

# उमेचें दुर्दैव



दुसरे दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर हेमचंद्रानें आदल्या दिवशींचा सर्व वृत्तांत बिंदूच्या कानावर घातला. बायकांचीं दुःखें बायकांनाच दूर करतां येतात, असा त्यास भरंवसा होता, म्हणून बिंदूनें तात्काळ उमाकडे जाऊन तिचें सांत्वन करावें असें त्यानें बिंदूला सुचवलें. उमेची दुर्दशा ऐकून बिंदूचें हृदय दुःखानें भरून आलें. पदरानें डोळे पुशीत ती म्हणाली, " हें होईल याची मला आधींच कल्पना होती. उमेला देखील आपलें हें भविष्य कळून चुकलें होतें ! "

" तें कसं काय ? " हेमचंद्रानें आश्चर्यानें विचारलें.

" उमेच्या कानांवर या गोष्टी थोडथोड्या येतच होत्या." बिंदू म्हणाली, " तालपुष्करला असतांना एकदां ती मजपुढें ढळढळां रडली होती. तिचा स्वभाव मानी आहे म्हणून ती सहसा कुणाजवळ या गोष्टी बोलत नाहीं इतकेंच काय तें ! "

" बिचारी उमा ! " हेम खेदानें म्हणाला, " असल्या या स्वैर वर्तनानें धनंजय लौकरच आपल्या प्रकृतीचें अन् पैशाचें दिवाळें वाजवून बसेल आणि मग पुढें उमेच्या हातीं भिकेची झोळी आल्यावांचून राहणार नाहीं ! "

" तुम्ही पुढच्या गोष्टींचा विचार करतांहात– " बिंदू म्हणाली, " मी तर आजच्याच परिस्थितीची चिंता वाहते आहे. बिचारी उमा ! आपल्या

पतीचं हें वर्तन, त्याच्याकडून होणारी स्वतःची उपेक्षा, स्वतःचा अपमान हें ती कसं सोशीत असेल? इथें ना तिचे आईबाप, ना नातेवाईक, ना मैत्रिणी! पोटीं एकादं मूलबाळ असतं तर त्याच्याकडे बघून तरी उमेला आपल्या दुर्दैवाचा विसर पडला असता. पण देवानं तेवढंहि सुख तिला दिलं नाहीं!"

त्याच दिवशीं दुपारीं पालखींत बसून बिंदू उमाला भेटावयाला गेली. आपल्या सुंदर व सुसज्जित शय्यागृहांत आरशापुढें बसून उमा केस विंचरीत होती. उमेकडे बघून बिंदूला धक्काच बसला. साऱ्या तालपुष्कर-मध्यें अप्रतिम लावण्यवति म्हणून प्रसिद्ध असलेल्या उमेची आज काय अवस्था झाली होती! तिचा तजेलदार चेहरा आतां सुकून फिका पडला होता. तिचे टपोरे डोळे निस्तेज होऊन त्याभोंवतीं मोटमोठीं काळीं वर्तुळें पडलीं होतीं. तिचा प्रमाणबद्ध व सुंदर डौलदार बांधा नाहींसा होऊन त्याजागीं आतां केवळ हाडें उरलीं होतीं! चार महिन्यांपूर्वी सौंदर्य व तारुण्य यांचा सुंदर आदर्श भासणारी उमा आज चाळीशीच्या घरां-तली दुखणेकरीण वाटत होती!

बिंदूला बघतांच उमेचे निस्तेज डोळे क्षणभर लकाकले. "आलीस बिंदूताई! ये, मला कितीदां तुझी आठवण व्हायची. बरीं आहेत ना तुझी मुलंबाळं?" ती बिंदूचे स्वागत करीत उत्सुकतेनें म्हणाली.

"आम्ही सगळे खुशाल आहोंत." घशांत आलेला दुःखाचार हुंदका दाबून बिंदू म्हणाली, "पण उमा, तुझं कसं काय चाललंय्? तूं कशानं एवढी अशक्त झालीस?"

"ही कलकत्त्याची हवा मला मानवत नाहींसं दिसतंय्-" उमा शांतपणें म्हणाली, "मध्यंतरीं जरा खोकलाहि झाला होता, पण आतां माझी तब्येत ठीक आहे."

" इथें तुझी व्यवस्था कोण बघतं उमा ? घरांत तर कुणी मायेचीं माणसं पण नाहींत ! " बिंदूनें प्रश्न केला.

" माझ्या यजमानांनीं डॉक्टर आणला होता. त्यानं औषधं लिहून दिलीं आहेत तीं मी घेतें." उमेनें थोडक्यांत उत्तर दिलें !

" उमा, तूं श्रीमंत आहेस. तुला गडीमाणसांची किंवा औषधपाण्याची वाण पडत नसेल हें मला समजतें." बिंदू म्हणाली, " पण ताई, माणसाला नुसती औषधेंच का हवीं असतात ? धनंजयबाबू नाहीं का तुझी काळजी घेत ? "

" मला जें जें लागतें तें सारें त्यांच्याकडून मला मिळतें ! " उमेनें गंभीरपणानें उत्तर दिलें.

बिंदूनें उमेकडे निरखून पाहिलें. त्या मानी मुलीच्या अंतःकरणांत चाललेला झगडा तिला स्पष्टपणें दिसून आला. उमा अत्यंत दुःखी होती. तिचें मन अनंत यातना सोशीत होतें. पण आपल्या हृदयांतलें हें दुःख दुसऱ्या कुणापुढेंहि उघडें करावयाची तिची इच्छा नव्हती.

बिंदूसारख्या बालमैत्रिणीला ,सुद्धां आपल्या दुःखाचा सुगावा लागूं देण्याला उमा तयार नव्हती. व त्यामुळेंच ती असें तुटकपणानें बोलत होती. तिच्या अभिमानी स्वभावाचें बिंदूला कौतुक वाटलें; पण त्याबरोबर तिच्या दुःखाबद्दल तिला सहानुभूतिहि वाटली. जरा वेळानें बिंदू म्हणाली, " उमा, तूं माझं ऐक. कांहीं दिवस तूं स्वतः माहेरीं जा, नाहीं तर काकूला तरी इकडे बोलावून घे. किती ग बदलली आहेस तूं एवढयांत ! "

बिंदूचे ते मायेचे शब्द ऐकून टचकन् उमाच्या डोळ्याला पाणी आलें. पदरानें डोळे पुशीत ती बिंदूला म्हणाली. " बिंदूताई, किती माया तुझी आहे मजवर ! "

" माझी तुजवर माया आहे हें खरं ना ? " बिंदू चटकन् म्हणाली,

" मग कां वरं माझ्याशीं असा लपंडाव खेळते आहेस तूं उमा? माझ्या-पासून आपलं दुःख तूं का लपवते आहेस? तुझी अवस्था मला दिसत का नाहीं? पतीचं प्रेम पूर्वीसारखं लाभत नसल्यामुळं तूं निराश होऊन आयुष्याला विटली आहेस हें का मला कळत नाहीं? "

बिंदूच्या त्या प्रेमळ पण निर्वाणीच्या उद्‌गारांपुढें उमेचा मानीपणा टिकूं शकला नाहीं. तिच्या दुःखाचा बांध फुटला आणि बिंदूच्या गळां पडून ती ढसढसां रडूं लागली.

तिला थोपटीत बिंदू म्हणाली, " हं! आतां सांग पाहूं ताई सगळं मला! आपल्या मायेच्या माणसांजवळ दुःख बोलून दाखवलं म्हणजे त्याचा फणकारा तेवढाच कमी होतो. सांग ताई, धनंजय पूर्वीसारखं तुजवर प्रेम करीत नाहींत का? "

उमा क्षणभर स्तब्ध राहिली आणि मग अत्यंत कडवटपणानें ती म्हणाली, " त्यांना माझा आतां कंटाळा आला असेल! "

बिंदूला घडीभर काय बोलावें तें सुचेना. मग ती म्हणाली, " पतीचं प्रेम हें स्त्रियांचं सर्वस्व आहे. पतीचं प्रेम हें सर्वांत मोठं वैभव आहे. गरिबांना तर तो मोठाच आधार आहे. पतीनं पत्नीवर प्रेम केलं पाहिजे आणि पत्नीनेंहि पतीवर तसंच निष्ठेनं प्रेम करायला पाहिजे. पण उमा, एक लक्षांत ठेव; नुसत्या प्रेमानं हा संसार चालत नसतो. पत्नीचीं कांहीं कर्तव्यं असतात— " ती किंचित् थबकली.

उमा मंदपणें हंसून म्हणाली, " बोल ना बिंदूताई पुढें? मी ऐकते आहे. "

बिंदू म्हणाली, " मी कांहीं नवीन सांगत नाहीं. प्रत्येक स्त्रीला या गोष्टी मूळच्याच कळत असतात. या संसारांत लहानमोठ्या अडचणी अन् दुःख हीं दर दिवशीं येत असतात. पण घरांतल्या गृहिणीनं न चिड-चिडतां, न संतापतां या अडचणींतून धैर्यानं अन् हंसतमुखानं मार्ग काढला

पाहिजे. मन प्रसन्न ठेवलं पाहिजे. स्त्रीच्या अंगीं हे गुण असले तर घरांत शोभा राहते. आनंद रहातो.स्त्री ही प्रेमळ असली पाहिजे तशीच ती सहनशीलहि असायला पाहिजे. उमा, मी पुष्कळ घरं अशीं पाहिलीं आहेत कीं जेथें पतिपत्नींचं एकमेकांवर भरपूर प्रेम होतं. पण या प्रेमाच्या जोडीला, थोडी सहनशीलता, थोडी मिळतं घेण्याची वृत्ति नसल्यामुळें तीं घर दुःखानं काळवंडून गेलीं. त्या पतिपत्नींचे संसार रखरखित वाळवंटाप्रमाणें उजाड अन् भकास झाले—"

"तूं म्हणतेस तें खरं आहे ताई–" उमा खिन्नपणें म्हणाली, "पण ताई, माझं थोडसं ऐक. आपण स्त्रिया लहानपणापासून रामायण, महाभारत वाचतों. पुराणं वाचतों. रामसीतेचे, सत्यवान् सावित्रीचे आदर्श आपल्या डोळ्यापुढें असतात, अन् आपल्याला वाटतं कीं संसार म्हणजे एकनिष्ठ पतिपत्नींनीं एकत्र भोगलेलीं सुखदुःखं. पण विंदू, प्रत्यक्ष संसार करूं लागल्यावर आपल्यांला काय अनुभव येतो ? कथा-पुराणांतल्या स्त्रीपुरुषांचे आदर्श प्रत्यक्ष संसारांत उपयोगी पडत नाहींत, संसारांत आपलं प्रेम, आपली एकनिष्ठा कधीं कधीं पायदळीं तुडवली जाते !"

"उमा, तूं म्हणतेस तें खरंहि असेल. पण त्याचं कारण म्हणजे आपण सर्वजण अखेर माणसंच आहोंत. आपल्या अंगीं लहानसहान दोष असायचेच. पुरुष काय किंवा स्त्री काय, संपूर्णपणें निर्दोष नसतेच म्हणून तर संसारांत पतिपत्नींनीं एकमेकाचे दोष पोटांत घालून, एक-मेकांच्या उणीवांची भरपाई करून आयुष्य सुखी करायचें असतें. पतिपत्नी हे मित्र असावेत, सहचर असावेत."

विंदूचें बोलणें मध्येंच थांबवीत उमा म्हणाली, " ताई, तुझा संसार अशा तऱ्हेचा असेल. पण माझा संसार असा नाहीं. मी अगदीं निर्दोष

नाहीं, आणि माझे पति पण मोठे साधुपुरुष नाहींत. माझ्या संसाराच्या खेळांत मी हरलें आहे ताई!"

"वा!" तिचा निषेध करीत बिंदू चटकन् म्हणाली, "एवढ्या तरुण वयांत ही निराशेची, हरल्याची भाषा काय म्हणून बोलावी? उमा, आज तुझं वय वीस वर्षांचं आहे! एवढ्या कोंवळ्या वयांत तूं अशी विरक्तपणाची भाषा कां वापरतेस? आलेलीं संकटं काय अशींच रहाणार आहेत? उमा, एक ध्यानांत ठेव, स्त्रीच्या एकनिष्ठ प्रेमापुढें आणि सेवेपुढें संसारांतलें कोणतेंहि संकट, कसलेंहि दुःख टिकाव धरून राहणें शक्य नाहीं!"

"हीच आशा मनांत बाळगून आम्ही पुनः पुन्हा लाचारपणें पतीच्या पायांवर लोळण घेतो आणि ते आम्हाला कुत्र्यासारखे झिडकारून देतात." उमा कडवट वृत्तीनें चिडून बोलली.

बिंदूनें उमेला आपल्या छातीशीं कवटाळून धरलें. उमेच्या दुःखाचा व संतापाचा आवेग नाहींसा झाल्यावर बिंदू हळूंच म्हणाली, "उमा, असं बोलूं नये. अग, या संसारांत दुःखं, संकटं, अडचणी यायच्याच. त्यांना भिऊन कसं चालेल? या अडचणींवर मात करण्यांतच तर खरी बहादुरी आहे. पूर्वी जेव्हां मोठमोठीं कुटुंब एकत्र नांदत असत, तेव्हां आपणां-सारख्या तरुण मुलींना या अडचणींचा विचार करण्याचं कारण नसे. घरांतलीं कर्ती माणसं त्या गोष्टी बघत असत. पण आतां विभक्त कुटुंबपद्धति असल्यामुळें तरुण वयांतच आपणांवर ही जबाबदारी पडते. अन् त्यामुळें आपल्यालाच या संकटाशीं झगडावं लागतं."

उमा जरा थबकली आणि मग म्हणाली, "मला तर वाटतं ताई, या संसाराचा व्यापच नको. संसार सोडून अंगाला राख फासुन परमेश्वराचें चिंतन करीत राहणारे ते विरक्त संन्यासी आपणांहून किती सुखी, किती भाग्यवान् म्हटले पाहिजेत!"

"ते भाग्यवान् खरेच!" बिंदू म्हणाली, "पण ताई, आपणाला सर्वांना कांहीं त्यांच्यासारखे विरक्त होऊन संसार सोडतां येणार नाहींत! आणि ताई, संसार नीटनेटका करणें हें देखील एक मोठें पुण्यकर्मच आहे. माझी खात्री आहे. कीं परमेश्वर आपलीं दररोजचीं कामें बघत असतों. आणि तीं जर आपण निष्काम वृत्तीनें यथासांग पार पाडलीं, तर साधुसंन्यांशाइतकंच आपणांलाहि पुण्य प्राप्त होतं!"

बिंदूचे शब्द उमेला अमृतासारखे गोड लागत होते. तेवढयांत खालीं चौकांत गाडी येऊन उभी राहिल्याचा आवाज कानीं पडला. गडी माणसें बाहेर धांवलीं. उमेचा चेहरा एकदम फिका पडला. झटकन् बिंदूच्या कानाशीं लागून रुद्ध स्वरांत ती पुटपुटली....

"ताई, त्या खिडकींतून जराशीं खाली वांकून बघ, म्हणजे माझ्या सुखी संसारांतला एक नमुनेदार देखावा तुला बघायला मिळेल!"

बिंदूनें जें पाहिलें त्यानें तिचें हृदय दुभंगून गेलें. गाडींतून उमेचा पति धनंजय हा खालीं उतरत होता. अतिरिक्त मद्यपानानें तो बेहोष झाला होता. पावलोंपावलीं त्याचे झोकांडे जात होते, त्याच्या गड्यांनीं त्याला हात देऊन सांवरलें. आणि ते त्याला हळू हळू माडीवर घेऊन गेले.

बिंदूनें उमेला आपल्या हृदयाशीं घट्ट कवटाळून धरलें. ढळढळा रडत ती उमेला म्हणाली, "उमा, काय ग बाई तुझ्या नशिबाची परवड ही? पण ताई, धीर सोडू नकोस. आलेलं संकट धैर्यानं सहन कर. देव तुझी कसोटी पहात आहे. पण आज ना उद्यां त्याला खचित तुझी दया येईल आणि मग तो तुला सुखाचे दिवस दाखविल्यावांचून रहाणार नाहीं!"

## दुर्गापूजेच्या प्रसंगीं— १०

वंगाल्यांत दुर्गापूजेचा सोहळा प्रेक्षणीय असतो. सिंहराशीनंतर येणारी कन्या रास ही सिंहावर बसून आलेली दुर्गादेवी मानून तिची पूजा करण्याचा प्रघात आहे. यावेळीं ऋतुमान मोठें प्रसन्न असतें. पाऊस थांबलेला असतो. पावसाळ्यांत दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या आंता शांत झालेल्या असतात, आणि पृथ्वी स्नान घरांतून बाहेर आलेल्या स्त्रीसारखी तजेलदार व टवटवीत दिसत असते. मैदानें कोंवळ्या गवतानें हिरवीगार होतात. हवा उत्तेजक वाटते, आणि रात्रीच्या वेळीं चंद्राच्या रुपेरी चांदण्यांत साऱ्या सृष्टीला कांहीं निराळेंच सौंदर्य प्राप्त होतें. शेतकरी या सुमारास आपल्या कामांतून मोकळे झालेले असतात. भात कोठींत जाऊन पडलेलें असतें. सावकारांचीं देणीं चुकतीं झालेलीं असतात आणि शेतकरी स्त्रीपुरुष मोठ्या आनंदानें दुर्गापूजा साजरी करतात. श्रीमंत आणि गरीब दोघांनाहि दुर्गापूजेचे सारखेंच आकर्षण असतें. सासुरवाशिणी माहेरीं येतात, शेतकरणी बाजारांत जाऊन शंखांच्या बांगड्या, कांचेचे मणी व नक्षीदार काठांच्या साड्या खरेदी करतात आणि प्रत्येकजण आपापल्या ऐपतीप्रमाणें दुर्गापुजेच्या आनंदोत्सवांत गढून जातो.

पण दुर्गापूजेसारख्या आनंदाच्या प्रसंगींहि उमेचें दुःख शांत झालें नाहीं. धनंजयाला, तिच्या पतीला आपल्या व्यसनाची लाज वाटे, पण त्या व्यसनावर त्याला ताबा ठेवता येईना. शिवाय त्यांच्याभोंवतीं जमलेली

चैनबाज मित्राची चांडाळचौकडी त्याला व्यसनांत अधिकाधिक गुंतवि-ण्यासाठीं टपलेली होतीच. दिवसेंदिवस धनंजय व्यसनांच्या चिखलांत अधिकाअधिक खोल रुतत चालला. उमा प्रारंभीं शोक करीत असे. पण पुढें पुढें एक तऱ्हेचा चमत्कारिक शांतपणा तिनें धारण केला. मग तिच्या मनांत काय असेल ते असो.

शरदूनें हेमच्या घरी येणें एकाएकीं बंद केलें. बिंदूनें वरचेवर निरोप धाडूनहि कांहीं उपयोग होईना. बिंदू त्याच्यासाठीं गोड व चवदार पदार्थ तयार करून त्याच्या घरीं पाठवी ते मात्र तो खाई, परत करीत नसे.

दुर्गापूजेचा दहावा दिवस होता. दहाव्या दिवशीं पूजा संपते. त्यामुळे त्या दिवशीं उत्सवाचा थाट कांहीं औरच असतो. दुर्गेची प्रतिमा रस्त्यानें मिरवीत मोठमोठे स्त्रीपुरुषांचे जमाव हंसतखिदळत जात होते. सर्वांच्या अंगावर भारी वस्त्राभरणें झळकत होतीं. मधुर संगीताचे स्वर वातावरणांत घुमत होते. रात्रीं दुर्गेचे नदींत विसर्जन झाल्यावर सर्वजण आपापल्या घरीं आले आणि मग एका वेगळ्याच समारंभाला सुरुवात झाली. सारे नातलग परस्परांना प्रेमानें भेटले, लहानांना पोटाशीं कुरवाळून वृद्धांनीं त्यांना प्रेमाचे आशीर्वाद दिले. सर्वांचीं अंतःकरणें गहिंवरून आलीं, मनांतले रागद्वेष शांत झाले आणि अशा समाधानाच्या वृत्तींत दुर्गापूजा समाप्त झाली.

त्या दिवशीं बिंदूच्या घरीं रात्रीचीं जेवणें आटोपायला बारा वाजून गेले. मुलें झोपलीं होतीं. हेमचंद्र झोंपला होता. सुधाहि झोंपी गेली होती. बिंदू स्वैयपाकघरांत मागचीं कामें उरकीत होती. सारीं कामें आटोपल्यावर तिनें स्वैंपाकघराचें दार बंद करून घेतलें. तोंच दारावर बाहेरून कुणीतरी जोरानें ' टकटक ' केलें.

बिंदू चमकली. या भलत्या वेळीं आपणांकडे कोण आले असेल, याची तिला कल्पनाच करता येईना. तिला थोडी भीतीहि वाटली. जरा वेळानें जिवाचा घडा करून तिनें प्रश्न केला, " कोण आहे ? "

उत्तर आलें नाहीं, मात्र पुन्हां 'टकटक' झाली. हेमचंद्राला जागें करावें कीं काय असें बिंदूच्या मनांत येऊन गेलें. पण तो दिवसभर दमला असल्यामुळें या वेळीं त्याला उठवणें तिला प्रशस्त वाटलें नाहीं. अखेर पुढें होऊन तिनें धिटाईनें दार उघडलें. दाराबाहेर उभ्या असलेल्या व्यक्तीला पाहून बिंदू चमकली.

बाहेरच्या अंधारांत शरद् उभा होता. किती बदलेला दिसत होता तो ? त्याचे केंस लांब वाढले असून ते त्याच्या कपाळावर अस्ताव्यस्तपणें विखुरले होते. त्याचे डोळे विस्फारित झाले असून ते निखाऱ्यासारखे धगधगत होते. त्याचें शरीर कृश झालें होतें. आणि त्याची चर्या ओढलेली दिसत होती.

त्याच्या त्या चमत्कारिक अवताराकडे बिंदू बघतच राहिली.

" बिंदूताई " शरद् हळूच म्हणाला, " आज पूजेचा दहावा दिवस ना ? म्हणून तुझ्या पाया पडायला आलोंय मी ! " आणि त्यानें लवून बिंदूच्या पायांना स्पर्श करून तिला वंदन केलें.

" शतायुषी हो बाबा ! तुला चांगली बायको मिळूं दे आणि तुझें घर गोजिरवाण्या मुलांबाळांनीं भरून जाऊं दे." बिदूनें त्याला उठवून प्रेम-भरानें आशीर्वाद दिला. नंतर शरद्कडे निरखून बघत ती म्हणाली, " किती दिवसांनीं आलास रे शरद् ? आणि किती खराब झाला आहेस तूं ? तुझा चेहरा किती फिका झालाय्, अन् डोळे कसे खोल गेले आहेत ! परीक्षेच्या काळजीनें का इतका खंगला आहेस तूं ? अरे, अभ्यास करावा, पण तो करतांना तब्येतीची अशी हेळसांड करूं नये ! आपल्या जिवापेक्षां का ती परीक्षा जास्त आहे ? "

शरद्च्या सुकलेल्या ओठावर क्षणभर स्मित चमकलें. नंतर तो म्हणाला, " परीक्षेच्या काळजीनें नाहीं खंगलों मी बिंदूताई. नुसत्या परीक्षेवर का माणसाच्या आयुष्यांतलें सारें सुख अवलंबून असतें ? "

"तर मग कसल्या काळजींत आहेस तूं ?" नवल वाटून बिंदूनें प्रश्न केला.

त्यावर शरद्नें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यानें बिंदूला आपल्या जवळ बसवून घेतलें. तिचे दोन्ही हात आपल्या हातीं धरले आणि त्या हातांवर आपलं मस्तक टेकून तो अश्रु ढाळूं लागला.

बिंदूच्या आश्चर्याची परमावधि झाली. "हें काय शरद ?" ती घाबरून म्हणाली, "कसलं दुःख होतंय् तुला ? कसली चिंता लागली आहे तुझ्या मनाला ? मी तुझ्या बहिणीसारखी. मजजवळ नाहीं का आपलें दुःख सांगणार तूं ?"

"बिंदूताई," शरद् खालच्या मानेनं म्हणाला, "तूं खरेंच माझी बहीणच आहेस, अन् तुझ्याजवळ मन मोकळें करायसाठींच आज आलोंयू मी. पण ताई–कसं सागूं तुला ? मी फार वाईट माणूस आहे ग !" आणि तो थरथर कांपूं लागला.

बिंदू आतां अधिकच घाबरली. शरद्चा चेहरा चमत्कारिक दिसत होता. त्याचे डोळे जळत्या अंगारासारखे चमकत होते आणि बिंदूचे हात त्यानें इतके घट्ट पकडले होते कीं, तिच्या हातांना रग लागली होती. भयभीत होऊन बिंदू म्हणाली, "शरद्, तूं मला घाबरवून सोडलं आहेस ? तुझ्या मनांत आहे तरी काय ? सांग मला लौकर-भिऊं नकोस, बोल."

शरद्नें एक कोरडा हुंदका दिला आणि मग खालीं मान घालून दाट-लेल्या गळ्यानें तो म्हणाला, "ताई, मी फार दुष्ट माणूस आहे ग. मी फार पापी आहे. तुम्ही मला किती प्रेमानं वागवलंत, पण मी चांडाळानं त्या प्रेमाचा भलता फायदा घेतला मी. दगलबाजी केली ताई—"

बिंदू आतां मात्र खरोखरच रागावली. आपले हात त्याच्या हातांतून ओढून घेत ती म्हणाली; "नीट सांगायचं आहे कीं नाहीं तुला ?"



शरद् तिच्याकडे केविलवाणेपणानें बघत म्हणाला, " ताई, तूं बोलणार नाहींस ना कुणाजवळ ? "

" नाहीं. " विंदूनें आश्वासन दिलें.

" तर मग ऐक विंदूताई—" तिच्या हातांमध्यें आपलें तोंड लपवीत शरद् म्हणाला, " तुझी वहीण सुधा-तिच्यावर मी प्रेम करतों. आमचं लग्न घडवून आण ताई ! "

विंदूच्या मस्तकांत खाडकन् प्रकाश पडला. गेल्या सहा महिन्यांत शरद्नें जें चमत्कारिक वर्तन आरंभलें होतें त्याचा तिला आतां उलगडा झाला. शरद्च्या हृदयांतील वादळाची तिला पुरेपूर कल्पना आली.

एकदां आपल्या मनांतलें रहस्य उघडें केल्यावर मग शरद् भरभर बोलत सुटला. सुधेला प्रथम पाहिल्यावर तिच्या सौंदर्यानें तिच्या निष्कपट स्वभावानें आपण कसे मुग्ध झालो, तिच्या वैधव्याबद्दल आपणान कशी करुणा वाटली, आणि मग हळू हळू तिच्याविषयीं आपल्या हृदयांत कशी प्रेमभावना निर्माण झाली हें सांगून मग तो म्हणाला, " ज्या क्षणीं माझें मन मला कळलें त्या क्षणापासून माझ्या भावनांना आवरण्याचा, सुधेला विसरण्याचा मी प्रयत्न करीत आहे. पण ताई, आतां तें शक्य नाहीं ताई, मी फार पापी आहे. मी दुबळा आहे. पण ताई, तूं नाहीं ना मजवर रागावलीस ? आपल्या भावाचा तुला तिटकारा नाहीं ना आला ? "

विंदू यावर काय उत्तर देणार ? विधवा सुधेचा पुनर्विवाह ! हिंदू मनाला ती कल्पना भयानक वाटते. सुधेचें शरद्शीं लग्न लावून दिलें तर सारी जानगंगा आपणांवर उलटेल याची तिला पूर्ण कल्पना होती. पण हें सारें ती शरद्ला कसें समजावून सांगणार ? शेवटीं ती हळूच म्हणाली, " हें बघ शरद्, मी तुजवर रागावले नाहीं आणि तूं कांहीं पापहि पण केलेलें नाहींस, मी तुला माझा भाऊ मानते आणि तुजवरचें माझें प्रेम कधींहि

कमी होणार नाहीं. आतां मी काय म्हणतें. तें ऐक. तूं आत्तां सुधेविषयीं जें काय बोललास तें मला माझ्या पतीच्या कानावर घातलें पाहिजे. नाहीं का? त्यांचें म्हणणे नको का समजून घ्यायला या बाबतींत?"

शरद्‌नें संमतीदर्शक मान हलवली. नंतर बिंदूचा निरोप घेऊन तो जावयास उठला. जातांना तो म्हणाला, "बिंदूताई, हेमचंद्राला या बाबतींत तूंच काय तें सांग. त्याच्यापुढें या गोष्टी बोलायची माझी छाती होणार नाही. तूं त्याचें मन समजावून घे अन् मग तूंच मला माझ्या नशिबीं काय आहे तें कळव. कधीं बोलशील तूं हेमचंद्राजवळ?"

"या गोष्टी घाईनं थोड्याच बोलतां येणार आहेत?" बिंदू विचारमग्न होऊन म्हणाली, "तरी पण दोन तीन आठवड्यांत मी काय तें तुला कळवीन."

"ठीक तर, जातो मी आतां. यावर आतां थेट दिवाळींतील अव-सेच्या दिवशीं मी तुजकडे येईन आणि त्या दिवशींच माझ्या दैवाचा निर्णय मी लावून घेईन. तोंवर मी तुझ्या घरीं येणार नाहीं." एवढें बोलून शरद् झटकन् तेथून निघून गेला.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क. ३३-९८ नों. दि. ............
वि. ............ क. ..................



शरद् ज्या वेळीं विंदूच्या घरांतून बाहेर पडला त्याच वेळीं दुर्गापूजेची कांहीं मिठाई देण्यासाठीं म्हणून एका शेजारिणीची मोलकरीण विंदूकडे आली. शरद्चे बरेंचसें भाषण तिच्या कानांवर पडलें होतें. आधींच गडीमाणसें ही जात्या चौकस असतात. कुणाच्याहि घरीं कांहीं भानगड असल्याचा सुगावा लागला कीं आपले कान तीं तावडतोब टवकारतात. त्यांतून यावेळीं तर काय सुधेशीं विवाह करण्याची आपली इच्छा शरद्नें बोलून दाखविल्याचें या मोलकरणीच्या स्पष्टपणें कानांवर पडलें होतें. मग काय विचारतां ! त्या उद्धट स्त्रीनें तात्काळ विंदूला म्हटलें, “ अगबाई, तुमच्या सुधा का शरद्ला लग्नशीं करायचंय् ! काय तरी चमत्कार ! तुमची सुधा विधवा आहे ना ? मग हें कसं जुळणार ! पण जुळेल बाई. कारण तुम्ही पडलांत बडे लोक ! बड्यांनीं काय वाटेल तें केलं तरी चालतं ! एखाद्या गरिबानं उद्यां असं कांहीं भलतं सलतं करायचं मनांत आणलं तर त्याला मात्र तावडतोब वाळींत पडावं लागेल !”

मोलकरणीचें हें बोलणें ऐकून विंदू चपापली. ही चहाडखोर बाई आतां आपल्या घरची ही गोष्ट चहूंकडे सांगत सुटेल आणि बिचाऱ्या निष्पाप सुधेचें नांव मात्र निष्कारण बदनाम होईल हें तात्काळ तिच्या ध्यानांत आलें. तिनें ट्रंकेंतून एक रुपया काढून तो त्या मोलकरणीच्या हातीं ठेवला व तिला आर्जवानें म्हटलें, “ बाई ग, त्या वेड्या शरद्च्या

वडबडीकडे काय लक्ष देतेस तूं? विधवेचं लग्न कधीं कुणी ऐकलं आहे ! आम्ही चांगली घरंदाज माणसं आहोंत. शरद्ची आई काशीला साधुसंताचं विरक्त आयुष्य घालवते आहे. शरद्ची बहीण काली ही जुन्या कर्मठ घराण्यांत नांदते आहे. अशा परिस्थितींत साऱ्या रीतीभातींवर अन् नाता-लौकिकावर पाणी सोडून हें मुलखावेगळं लग्न आम्ही कसें होऊं देऊं? जा. ही गोष्ट कुणाजवळ बोलूं नकोस. हा रुपया घे अन् तुला पूजेच्या निमित्तानं कांहीं चांगलं कापडचोपड खरेदी कर जा !"

विंदूनें मोलकरणीला रुपयाची लांच चारली खरी पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दुसरा दिवस उजाडतो न उजाडतो तों त्या सैल जिभेच्या मोलकरणीनें ही गोष्ट आपल्या मालकिणीजवळ बोलून टाकली-सुद्धां. मग काय ? दुपारीं जेव्हां श्यामीची आई, वामीची आई या सगळ्या-जणी एकत्र बसल्या तेव्हां सुधेवर टीकेचा एकच भडीमार उडवून दिला. सुधा एकादशी करीत नाहीं, ती कांठ लावलेली साडी नेसते, ती डोकीवर पदर न घेतां हेमशीं बोलते, सुधा आणि विंदू या दोघी वहिणी वस्ताद असून बिचाऱ्या शरद्ला आपल्या जाळ्यांत पकडण्याचा त्यांचा विचार आहे. एक ना दोन, अनेक गोष्टी काढून त्यांनीं बिचाऱ्या सुधेवर आपल्या जिभेचा पट्टा हवा तसा चालवून घेतला. इतकेंच नव्हे तर विंदू व तिचीं माणसें कायस्थ नाहींतच, नाहींतर असलें महाभयंकर कृत्य त्यांच्या हातून कधीं घडणें शक्य नाहीं असें सुद्धां त्यांनीं ठरवून टाकलें.

सुधेविरूद्ध उठलेल्या या टीकेला लौकरच पाय फुटले आणि घराघरां-तून तिच्यावर चर्चा सुरू झाली. उमेच्या आईच्या कानांवर ही गोष्ट गेली आणि तिनें विंदूला एक लांबलचक पत्र लिहून मुलीच्या कुळाला काळोखी फांसणारें कृत्य न करण्याबद्दल तिला ताकीद दिली. कालीच्या कानांवर हीं वार्ता गेली तेव्हां तिलाही मोठा खेद झाला. तिचेंहि विंदूला पत्र आलें. विंदूनें ही सर्व पत्रें आपल्या पतीला दाखविलीं. आणि एकां-

तांत जाऊन ती खूप रडली. जी गोष्ट गुप्त रहावी एवढ्यासाठीं तिनें खटपट केली होती, तिचा चहूंकडे बभ्रा होऊन विचाऱ्या सुधेचें नांव आतां सर्वत्र तिरस्काराचा विषय होऊन राहिलें होतें. विंदूनें ही सर्व टीका सुधेपासून लपवून ठेवण्याचा खूप प्रयत्न केला. शरदूनें आपणाला मागणी घातली ही गोष्ट सुधेला कळूं नये अशी विंदूची मनापासून इच्छा होती. परंतु विंदूची ही इच्छा सफळ झाली नाहीं.

सुधा ही कितीहि अजाण आणि निष्पाप असली तरी तिचें हृदय स्त्रीचें होतें. आपल्या वहिणीचे व मेव्हण्याचे गंभीर चेहरे, रात्रीं त्यांचें हळूंहळू चालणारें संभाषण, घरांतल्या मोलकरणी व दूधवालीची होणारी कुजबूज, आणि टपालानें दररोज येणारीं पत्रें—हें सारें पाहून घरांत कांहींतरी चमत्कारिक प्रसंग उद्‌भवला आहे याची तिला जाणीव झाली, इतकेंच नव्हे तर या प्रसंगाचा संबंध आपण स्वतः व शरद् या उभय-तशींच विशेषें करून आहे हेंहि पण तिच्या ध्यानांत आल्यावांचून राहिलें नाहीं. तिला निरनिराळ्या शंका येऊं लागल्या आणि मग संश-याच्या त्या दाट काळोखांतहि हळूंहळूं तिच्या डोक्यांत प्रकाश पडूं लागला. तिनें कुणाला कांहीं विचारलें नाहीं, पण तिचा फिकट चेहरा व चमकणारे शोधक डोळे यांवरून तिच्या अंतःकरणांत कांहीं गूढ विचार व चिंता खळवळत होत्या हें कुणासहि कळून चुकलें असतें.

अखेर एके दिवशीं सुधेला सर्व रहस्याचा स्पष्ट उलगडा झाला. एकदां रात्रीच्या वेळीं झोपण्यासाठीं ती आपल्या बिछान्याकडे जात असतां जमिनीवर चुरगाळलेला एक कागद तिला सांपडला. त्या कागदा-वर उमेच्या आईचें हस्ताक्षर दिसल्यामुळें सुधेनें साहजिकच कुतूहलानें तो उलगडून वाचला. तें उमेच्या आईचें विंदूला आलेलें पत्र होतें आणि त्या पत्रांत शरदूनें सुधेला घातलेल्या मागणीचा स्पष्ट उल्लेख होता. तें पत्र वाचतां वाचतां सुधा थरथर कांपूं लागली आणि तिचें हृदय वेगानें

धडधडूं लागलें जरा वेळानें तिच्या हातांतलें पत्र गळून पडलें आणि धड-पडत तिनें कसाबसा आपला बिछाना गांठला.

तें पत्र वाचून सुधेच्या मनाला प्रथम अत्यंत लज्जा वाटली. तिला शरद्‌चा राग आला आणि आपल्या स्वःच्या हातून कांहीं तरी अतिशय गलिच्छ व अमंगळ पाप घडलें आहे असें तिला वाटूं लागलें. तिचें अंतःकरण शरमेनें व दुःखानें खचून गेलें आणि आपलें तोंड कुणाला दाखविण्यास देखील तिला संकोच वाटूं लागला. परंतु कांहीं काळानें तिची दुःखाची व लज्जेची भावना ओसरली आणि मग एका अद्‌भुत व सुंदर आशेनें तिचें हृदय फुलून, उमलून आलें. शरद्‌नें आपणांस पत्नीपदावर चढविण्यास तयार व्हावें या कल्पनेनें तिला अभिमान वाटला आणि शरद्‌विषयींच्या कृतज्ञतेनें तिचें अंतःकरण उचंबळून आलें. आजवर अंधारून गेलेल्या तिच्या तरुण आणि अननुभवी मनाचा कोपरा न् कोपरा आतां एका लखलखीत प्रकाशानें उजळला.

एके दिवशीं दुपारच्या वेळीं बिंदू आपल्या झोंपण्याच्या खोलींत आली. बघते तों सुधा कसलेंसें पुस्तक वाचण्यांत अगदीं गढून गेली आहे ! बिंदूला बघतांच सुधेनें घाईघाईनें हातांतलें पुस्तक मिटून टाकलें. तेव्हां बिंदूनें विस्मयानें व कुतूहलानें प्रश्न केला,

" कसलें पुस्तक आहे तें सुधा ? "

" ती बंकिमचंद्रांची कादंबरी आहे. " सुधा खाली बघत म्हणाली. " विषवृक्ष नांवाची ! "

बिंदूचा चेहरा गंभीर झाला. बहिणीच्या हातांतलें पुस्तक काढून घेत ती जरा कठोर स्वरांत म्हणाली, " तूं हें पुस्तक वाचूं नकोस. सुधा, अजून लहान आहेस तूं. "

" वाईट पुस्तक आहे तें ? " सुधेनें हळूंच प्रश्न केला.

" नाहीं. तें फार छान पुस्तक आहे. " बिंदू म्हणाली, " पण तुझ्या तें उपयोगी नाहीं बेटा."

" त्याची गोष्ट काय आहे ताई ? " सुधेनें विचारलें.

बिंदू किंचित् घुटमळून म्हणाली, " गोष्ट थोडक्यांत अशी आहे कीं कादंबरीच्या नायकाशीं एक विधवा लग्न करते. पण तिचें आयुष्य दुःखी होतें आणि शेवटीं ती विष खाऊन मरण पावते! "

तें ऐकून सुधेचा चेहरा क्षणार्धात पांढा फटफटीत पडला. एक अवाक्षर न बोलता ती तेथून चालती झाली.

राजा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८५१२
विभाग बा.वा.
क्रमांक ३२६.३
नों. दि. १५।११।६७
सार्वजनिक शाखा.

# हेमची संमति

## १२

दीपावलींतील मध्यरात्र. दीपावली हा हिंदूंचा सर्वांत:मोठा सण. या सणामध्यें प्रत्येक शहर आणि प्रत्येक खेडें दिव्यांनीं अन् दारूकामानें उजळून जातें. रात्रींचा अंधार दीपमाला नष्ट करतात आणि पृथ्वीवरच्या लखलखाटापुढें आकाशांतले तारे फिके पडतात. श्रीमंतांचे महाल विद्युद्दीपांनीं झळकतात. इतकेंच नव्हे तर अगदीं गरिबांतला गरीब माणूससुद्धां आपल्या झोंपडीपुढें मातीची एक पणती उजळून हा सण साजरा करतो.

कलकत्ता शहर त्या रात्रीं असेंच उजळून निघालें होतें. शरद् आपल्या वसतिस्थानांतून बाहेर पडला आणि धडधडत्या छातीनें व हलक्या पावलांनीं तो वाटचाल करूं लागला. सभोंवतीं असंख्य दीप झळकत होते. आणि चहूंकडे दारूकामाची आतषबाजी चालली होती. पण या मनोहर शोभेकडे शरद्चें मुळींच लक्ष नव्हतें. केव्हां एकदां आपण हेमचंद्राकडे जातो आणि आपल्या भवितव्याचा निर्णय समजावून घेतों असें त्याला झालें होतें.

तो हेमच्या घरीं आला तेव्हां बिंदूऐवजीं खुद्द हेमनेंच त्याचें स्वागत केलें व त्याला हातीं धरून घरांत नेलें. शरद्चें हृदय आशा आणि निराशा यांच्या दरम्यान हेलकावे खाऊं लागलें व त्याची मोठी केविलवाणी अवस्था झाली.

दिवा मोठा करीत हेम म्हणाला, “ शरद् तुझ्या मागणीसंबंधीं बिंदूनें

मला सांगितलें. ”

“ हेम, ” अडखळत शरद् म्हणाला, “ तुमच्या मैत्रीचा फायदा घेऊन मी वाजवीपेक्षां अधिक धिटाई केली असें जर तुला वाटत असेल तर मला क्षमा कर. ”

“ तुझ्या हातून कांहींच चूक घडली नाहीं आणि क्षमा मागण्यासारखे त्यांत कांहीं नाहीं ” हेम म्हणाला, “ साऱ्या जगानें तुला नांवें ठेविलीं. तरी माझा तुजविषयींचा आदर व प्रेम यांना काडीमात्र धक्का लागणार नाहीं. विंदूच्याहि मनांत तुजविषयीं राग नाहीं. उलट ही मागणी घालतांना तूं जें धैर्य व मनाचा मोठेपणा दाखविला आहेस त्याबद्दल आम्हांला तुझें कौतुकच वाटतें. ”

“ मी तुमचा फार आभारी आहे. ” शरद् कसेंबसें पुटपुटला, पण हेमच्या बोलण्यांतला औपचारिकपणा बघून त्याचें मन निराशेनें खचूं लागलें होतें.

“ हें पहा शरद् ” हेमनें गंभीरपणें सुरुवात केली, “ मला प्रथम तुला कांहीं गोष्टी विचारायच्या आहेत. हा लग्नाचा बेत ठरवतांना तूं केवळ क्षणिक मोहाला बळी पडलेला नाहींस ना ? मागचा पुढचा सर्व विचार तूं नीट केला आहेस ना ? या कृत्याबद्दल सनातनी समाज तुला दोष देईल, कदाचित् तुला जातीबाहेर पडावें लागेल आणि पुढें तुझ्या मुलाबाळांनाहि जातींत मानाचें स्थान मिळणार नाहीं हें सारें तुझ्या ध्यानांत आलें आहे ना ? ”

शरद् क्षणभर स्तब्ध राहिला आणि मग दृढ स्वराने तो बोलूं लागला, “ हेम, माझ्यावर तूं विश्वास ठेव. मी तुला सत्य तेंच सांगत आहे. मी हा लग्नाचा विचार एका क्षणांत ठरवलेला नाहीं. गेले कित्येक दिवस मी या गोष्टीचा विचार करीत आहे. मी कोणतेंहि पाप करीत नाहीं याबद्दल माझी खात्री आहे, आणि समाजिक टीकेविषयीं किंवा जातींतून बहिष्कृत

होण्याविषयीं म्हणशील तर त्या गोष्टीचा मला कांहींच वाऊ वाटत नाहीं. रूढ नसलेली पण समाजहिताची अशी एखादी गोष्ट करायला कोणीहि माणूस पुढें सरसावला तरी त्याला ही सामाजिक टीकेची अगर वाळींत टाकलें जाण्याची भीति असतेच. पण अशी भीति माणूस बाळगूं लागला. तर मग कोणतीहि समाज-सुधारणा व्हायलाच नको. तुला माहीतच असेल कीं पन्नासएक वर्षांपूर्वी परदेशगमन व समुद्रप्रवास हा देखील आपणांकडे निषिद्ध मानला जात असे. पण सध्यां शेकडों स्त्री–पुरुष समुद्रप्रवास करून शिक्षणासाठीं अगर व्यापारासाठीं परदेशी जात आहेतच कीं नाहीं ? मात्र—" किंचित्‌अडखळून तो म्हणाला, " तुलाच जर माझें हें कृत्य दोषास्पद वाटत असले तर––"

" नाहीं शरद्–" हेम चटकन् म्हणाला, " मला किंवा बिंदूला तुझें हें कृत्य मुळींच दूषणीय वाटत नाहीं. पण ही गोष्ट घाईनें करून उपयोगी नाहीं; तिचे पुढचे परिणाम आधीं नीट ध्यानांत घेऊन मगच काय करायचें तें तूं ठरव एवढेंच माझें म्हणणें. नाहीं तर आज घाईघाईनें लग्न करून घ्यायचें आणि पुढें जन्मभर पस्तावा करीत बसावयाचें, यांत काय अर्थ आहे ?"

" मी पुढें पस्तावा करण्यासाठीं म्हणून नव्हे तर पुढें जन्मभर सुख लाभावें म्हणूनच हें लग्न करावयाचें ठरवलें आहे. " शरद् निश्चयीस्वरांत म्हणाला, " हेम, आपल्या निरनिराळ्या पुढाऱ्याकडे आणि समाजसुधारकांकडे पहा, या सर्वांनीं आपल्या तरुण वयांत रूढीचा व सामाजिक चालरीतींचा भंग केला होता ना ? पण त्यामुळें त्यांपैकीं कितीजणांना वृद्धावस्थेंत पस्तावा करावा लागला बरें ? एकालाहि नाहीं. उलट त्यामुळेंच आपला समाज चार पावलें पुढें सरकला म्हणून आज त्यांचीं नांवें आपण आदरानेंच घेतो. ना ? ईश्वरचंद्र विद्यासागर, मधुसूदन, केशवचंद्र, सुरेंद्रनाथ या सर्वांना एकेकाळीं समाजाचा रोष पत्करावा लागला होता, पण आज प्रत्येक हिंदु त्यांचें नांव किती गौरवानें उच्चारतो ! माफ कर हेम, या थोर

आणि उदार समाजाग्रणींच्या पंक्तीला मी स्वतःला बसवून घेतो असें समजूं नकोस. माझी तेवढी लायकी नाहीं. मी आपला एक साधासुधा विद्यार्थि. स्वतःच्या सुखासाठीं धडपडणारा माणूस आहे एवढेंच. पण मी याचा विचार करूनच हे पाऊल टाकीत आहे." •

"शाबास शरद् !" हेम उत्तेजित स्वरांत म्हणाला, "आपली बाजू तूं छान मांडलीस. तुझें हें कृत्य घाईनें होत नसून पूर्ण विचारान्तीं होत आहे याचा मला आनंद वाटतो."

"शिवाय हेम–" शरद् पुढें बोलूं लागला "सुधेवर माझें खरोखरीच अत्यंत प्रेम आहे. तिच्यासारखी निष्पाप, कोमल, मुग्ध आणि मोहक मुलगी मीं कुठें पाहिलीच नाहीं. ती श्रद्धावान् आणि इमानी आहे. अशी स्त्री ज्यावर प्रेम करील त्याचें भाग्य अपूर्व म्हटलें पाहिजे. खरेंच सांगतो, सुधा जर मला मिळूं शकली नाहीं. तर मला या जीवनांत कांहींहि आशा वाटणार नाहीं. हेम, मला आता अधिक काळ ताटकळत ठेवू नकोस. मला कांहीं आशा असेल तर तसें सांग, नाहीं तर मला माझ्या मूर्ख इच्छेबद्दल क्षमा कर–"

शरद्चे डोळे अश्रूंनीं भरून आले व त्यानें चटकन् बाजूला तोंड वळवलें. त्यांचा निर्धार पाहून हेमचंद्राला कौतुक वाटलें. शरद्चा अधिक अंत पहाण्यांत अर्थ नाहीं, असें वाटून तो झटकन् त्याच्या पाठीवरून हात फिरवीत प्रेमानें म्हणाला, "शरद्, तुझ्या व सुधेच्या विवाहाला माझी पूर्ण संमति आहे बरें ! जा, आतां माडीवर जा; तेथें बिंदूहि तुला आपली संमति आपल्याच तोंडानें सांगेल." शरदच्या डोळ्यांतून आतां आनंदाश्रू वाहू लागले. तो माडीवर गेला व बिंदूला त्यानें वंदन केलें. बिंदूनेंहि हंसतमुखानें त्याचें स्वागत करून त्याला आशीर्वाद दिला. "बिंदूताई" शरद कृतज्ञतेनें म्हणाला. "तुझे आणि हेमचे मी किती आभार मानूं? तुम्ही मला जन्माचें सुखी केलें."

" आमचें काय आभार मानतोस बाबा!" बिंदू थट्टेखोरपणानें म्हणाली, " अरे नवऱ्याला नवरी पसंत, नवरीला नवरा पसंत, मग आमच्या पसंतीचें काय?"

अशा रीतीनें बिंदूनें शरद्‌ची खूपच मस्करी केली; आणि मग गंभीरपणें ती म्हणाली, " शरद्, देवाच्याच मनांत तुमचा हा योग जुळून येणें असेल तर त्यांत आडकाठी आणणारे आम्ही कोण? परमेश्वर तुजवर आणि सुधेवर सर्व सुखांचा वर्षाव करो, आणि सुधा तुझी आज्ञा पाळणारी थोर, प्रेमळ गृहिणी होवो, असा मी तुला मनःपूर्वक आशीर्वाद देतें!"

अत्यंत हर्षभरित अन्तःकरणानें बिंदूचा निरोप घेऊन शरद् जिना उतरून खालीं आला, त्यावेळीं कोठीच्या दरवाजाला कुलूप लावीत असलेली पाठमोरी सुधा त्याला दिसली. सुधा कुलूप लावून मागें वळली तेव्हां शरद्‌ची आणि तिची दृष्टादृष्ट झाली. सुधेच्या हातांत दिवा होता व त्याचा सौम्य प्रकाश तिच्या मोहक आणि प्रेमळ चर्येवर खुलून दिसत होता. शरद् त्या रमणीय मूर्तीकडे बेभानपणें टक लावून बघत तसाच तेथें भारल्यासारखा उभा राहिला. त्याला पाहून सुधेचीहि तशीच अवस्था झाली. पण दुसऱ्याच क्षणीं ती अत्यंत लाजली. तिचें सर्वांग थरथर कांपूं लागलें.तिची दृष्टि खालीं वळली आणि तिचे गाल एकदम तांबूस झाले. तिनें चटकन् हातांतल्या दिव्यावर फुंकर मारली आणि आपला सलज्ज चेहरा अंधारांत बुडवून टाकला.

# आईची आज्ञा



हेमच्या घरांतून शरद् बाहेर पडला तेव्हां मध्यरात्र उलटून गेली होती. कलकत्याच्या रस्त्यांतून झगमगणारे दिवे आतां विझले होते. अंगावर भारी कपडे घालून हिंडणारे व हंसणारे खिदळणारे नागरिक आतां आपापल्या घरीं जाऊन झोंपल्यामुळें रस्ते उजाड आणि भकास दिसत होते. त्या निर्मनुष्य रस्त्यांवरून आपल्या घरीं परततांना त्याचें हृदय धडधडत होते. हेमच्या घरीं घडलेल्या सर्व घटना त्याला पुन्हां पुन्हां आठवत होत्या. तो आपल्या खोलींत पाऊल टाकतो न टाकतो तोंच त्याच्या गड्यानें एक पत्र त्याच्या हातीं दिलें. पत्रावर बनारसचा शिक्का असलेला पाहून शरद्चें हृदय उगीचच एकाएकीं भीतीनें चरकलें. पत्र फोडतांना त्याचे हात कांपत होते.

तें पत्र शरद्च्या आईचें होतें. पत्रांत तिनें लिहिलें होतें—

“ माझ्या बाळा,

माझे तुला अनंत आशीर्वाद. तूं सदोदित सुखांत असावे, कोठल्याहि अमंगळाचा तुला स्पर्श होऊं नये यासाठीं तुझी ही प्रेमळ आई येथें रात्रंदिवस श्री काशी विश्वेश्वराच्या चरणीं प्रार्थना करीत असते. शरद्, आज हें पत्र मी मुद्दाम तुला लिहित आहे. तुझ्याविषयीं एक भयंकर दुष्ट वार्ता माझ्या कानांवर येऊन पोहोंचली आहे. शरद्, लोक म्हणतात कीं, तूं सुधेशीं-एका विधवा मुलीशीं-विवाह करण्याचा बेत केला आहेस. पण माझा या बातमीवर विश्वास बसत

नाहीं. बाळा विधवेशीं लग्न करणें हें एक अपवित्र काम आहे. हें पाप आहे. असलें पाप आचरून आपल्या म्हाताऱ्या विधवा आईला तूं आतां दुःख देणार काय ? शरद्, आजवर या जगांत मी फार यातना भोगल्या आहेत. माझा या जगांतला मुक्काम आतां फार थोडा उरला आहे. तेव्हां माझ्या या अखेरच्या दिवसांत तरी असलें दुःख भोगणें माझ्या नशिबीं तूं आणूं नकोस. आपल्या कुळाच्या, आपल्या पित्याच्या नांवाचा तूं नीट विचार कर, कालीचा संसार बघून मी दुःखी आहेच, त्यांत हें नवें दुःख तूं मजवर कोसळूं देऊं नको. परमेश्वर तुला सद्‌बुद्धि देवो. मी ताबडतोब तुझ्या भेटीसाठीं कलकत्त्यास येत आहे.

—तुझी आई."

शरद्‌नें तें सर्व पत्र एकदां वाचलें, दोनदां वाचलें, तीनदां वाचलें आणि नंतर त्याच्या थरथरत्या हातांतून तें पत्र जमिनीवर गळालें. दुसऱ्याच क्षणीं शरद् मुर्च्छित होऊन जमिनीवर पडला !

कांहीं वेळानें त्याची मूर्च्छा मावळून तो शुद्धीवर आला. त्याचें हृदय काळ्याकुट्ट दुःखानें भरून गेलें होतें आणि त्याचें अन्तःकरण वेदनांनीं तडफडत होतें. आपल्या विवाहाच्या विरुद्ध आपली आई आहे, हें पाहून त्याला जबर धक्का बसला होता. स्वतःच्या होणाऱ्या निराशेबद्दल त्याला इतकें वाईट वाटलें नाहीं. परन्तु हेम, बिंदू आणि सुधा यांच्या निराशेच्या व दुःखाच्या कल्पनेनें मात्र त्याचें काळीज अगदीं फाटून गेलें. आपण सुधेला मागणी घातल्याचा बभ्रा आतां सर्वत्र झाला आहे. हें त्याला माहीत होतें. तेव्हां यापुढें आपण माघार घेतली, तर बिचाऱ्या सुधेवर सामाजिक टीकेचा केवढा भडिमार होईल, त्याची त्याला पुरेपूर कल्पना होती. त्या कल्पनेनें व्याकुळ होऊन तो ओरडला, "आई, या येवढ्या बाबतींत तुझी आज्ञा मी पाळूं शकत नाहीं. सुधेसारख्या निष्पाप मुलीची आणि हेमचंद्र, बिंदूसारख्या सात्विक मित्रमंडळींची मी कशी फसवणूक करूं ?"

सुधेच्या आठवणीनें तर शरद् फारच दुःखित झाला. गरीब विचारी निष्पाप भावडी मुलगी, सहा महिन्यांपूर्वी तिच्या मनांत विवाहाची काडीमात्रहि कल्पना नव्हती. परंतु आतां शरद्नेंच ते विचार तिच्या मनांत रुजवले होते. तिच्या हृदयांत एक नवा आनंद, एक नवी आशा त्यानेंच उत्पन्न केली होती. आणि आतां जर ऐन वेळीं त्यानें कच खाल्ली तर सुधेला जगांत कुठें तोंड काढायलाहि जागा राहाणार नाहीं. साऱ्या जातींत तिची बदनामी होईल. तिचें सारें आयुष्य दुःखमय होईल. बायका तिच्याविषयीं कुजबूजूं लागतील आणि शेवटीं या असह्य दुःखाच्या भारानें खचून त्यांतच तिला अकालीं मृत्यु येईल !

त्या भयानक कल्पनेनें शरद्चें मस्तक भ्रमूं लागलें. जरा वेळानें त्याला आपल्या आईचें स्मरण झालें. तिची दुःखी, कृश आणि जराजर्जर मूर्ति त्याच्या नजरेसमोर उभी राहिली. आणि त्याच्या मनानें पुन्हां पलटी खाल्ली. तो व्यथित हृदयानें म्हणाला, “ आई, तुझ्या या अखेरच्या दिवसांत तुला मी कसा दुखवूं ? मजकडून तुला दुःख पोंचण्यापूर्वीं हे माझे प्राण खुशाल जावोत ! ”

शरद् जागा झाला तेव्हां त्याची आई त्याच्या पायथ्याशीं उभी होती. रात्रीच कलकत्यास येऊन पोहोंचली होती. आईनें शरद्च्या सुकलेल्या तोंडावरून हात फिरवतांच त्याला एकदम शोकाचा उमाळा आला व तो म्हणाला, “ आई, मी कधींहि तुझ्या इच्छेविरुद्ध वर्तन करणार नाहीं. ” त्यावर त्याच्या आईच्या डोळ्यांत समाधानाचीं आसवें उभीं राहिलीं.

यानंतर थोड्याच दिवसांत कालीकडून शरद्ला पत्र आलें. या पत्रांत “ आपण सर्व मंडळी राणीगंजला गेलों असून तेथें आपला पति अतिशय आजारी आहे. ” असें कालीनें लिहिलें होतें. शरद् आधींच दुःखानें व निराशेनें खचला होता, यापुढें कलकत्ता शहर कायमचें सोडून या जगाच्या पाठीवर कुठेंहि भटकत रहावयाचें, असा त्यानें निर्धार केला होता.

कालीचें हें पत्र आल्यामुळें त्याला ताबडतोब राणीगंजला जाणें भागच पडलें. जाण्यापूर्वी हेमचंद्राच्या घरीं जाण्याचें किंवा तेथील मंडळीचा निरोप घेण्याचें धैर्य शरद्‌ला झालें नाहीं. पण योगायोग असा कीं नेमका स्टेशनवरच हेम शरद्‌ला भेटला. हेमनें शरद्‌ला काडीमात्रहि दोष दिला नाहीं. उलट तो म्हणाला, " शरद्, आपल्या म्हाताऱ्या आईला तूं दुखवलें नाहींस हेंच चांगलें झालें. हें लग्न होवो न होवो, मी तुला माझ्या धाकट्या भावाप्रमाणेंच मानतों व सदैव तसाच मानीन ! "


Pedneker

# धनंजयाचे अश्रू

## १४

हेमचंद्राच्या घरांत आतां उदासीनतेचें वातावरण पसरलें. कलकत्त्याला ज्या हेतूनें तो आला होता तो हेतु आतां निष्फळ ठरला होता आणि पुन्हां तालपुष्करला आपलें बिऱ्हाड न्यावें असे विचार हेमचंद्राच्या मनांत घोळत होते. बिंदूला शरद्‌चें पुन्हां पुन्हां स्मरण होई. आणि सुधा! तिचें तर सारें जगच अंधःकारमय होऊन गेलें होतें. तिच्या स्वभावांतला सारा खेळकर उल्हास नाहींसा होऊन तेथें आतां गांभीर्य आणि जडपणा आला होता.

उमेची प्रकृति सुधारत होती. एके दिवशीं उमेचें पत्र आलें.

" प्रिय बिंदू,

तुला एकदां भेटावयाची इच्छा आहे, हल्लीं माझ्या मनांत कांहीं विचित्रच कल्पना घोळत आहेत. मला वाटूं लागलें आहे, ज्यानें आपणास जन्माला घातलें तोच आपणाला खरें सुख आणि विश्रांति देऊं शकेल! बिंदूताई, तुला नाहीं कां असें वाटत?

तें कांहींहि असो, तुला एकदां भेटावें, तुला घट्ट मिठी मारावी असें फार फार मनांत येतें. आपल्या या वहिणीला भेटायला अगदीं तावडतोब ये.

— उमा."

उमेचें तें विचित्र पत्र वाचून बिंदूचें हृदय भयभीत झालें. उमेनें परमे-

श्वरासंबंधीं जें लिहिलें होतें तें तिला फार गूढ वाटलें. धडधडत्या हृदयानेंच ती उमेकडे गेली. उमेची प्रकृति ठीक दिसत होती. तिनें हंसून बिंदूचें स्वागत केलें.

उमेचा चेहरा किंचित् फिका होता पण तिचे डोळे कांहीं—विलक्षणच तेजानें चमकत होते. बिंदूनें तिला प्रेमानें हृदयाशीं धरून कुरवाळलें. उमेच्या दुःखाबद्दल आणि तिच्या घरांतल्या परिस्थितीबद्दल बिंदूनें जे प्रश्न विचारले त्यांना उमेनें तुटक आणि वरवरचींच उत्तरें दिलीं. शेवटीं किंचित् हंसून ती म्हणाली, "परमेश्वराच्या पायाशीं आपणां सर्वांना भरपूर जागा आहे." त्या वाक्याचा बिंदूला अर्थ कळला नाहीं.

बिंदूनें ज्यावेळीं उमेचा निरोप घेतला त्यावेळीं मात्र तिच्या हृदयांत दाटलेलें सारें दुःख उसळून बाहेर आलें. तिनें बिंदूच्या गळ्याला घट्ट मिठी मारली आणि ती ढळढळा रडूं लागली.

बिंदू आपल्या घरीं निघून गेल्यावर उमेनें आपले सर्व अलंकार आणि भारीं वस्त्रें एकत्र बांधून बाजूला ठेवून दिलीं. नंतर तिनें स्वतः एक अगदीं साधें पांढरें वस्त्र परिधान केलें. आपल्या खोलींतला दिवा मालवून टाकला आणि मध्यरात्रीं घर सोडलें. घराबाहेर पडल्यानंतर तिला थोडीशी भीति वाटली पण तेवढ्यांत धनंजयाची गाडी तिच्याजवळून भर्रकन निघून गेली. रस्त्यावरच्या एका दिव्याचा प्रकाश उमेच्या तोंडावर पडला होता. त्या उजेडांत धनंजयाची व तिची क्षणमात्र दृष्टादृष्ट झाली. पण धनंजय आपल्या नशेंतच होता. त्यानें तिला ओळखलें नाहीं. त्या घटनेचा उमेच्या मनावर फार परिणाम झाला. तिचें घुटमळणारें मन स्थिर झालें आणि ती घरीं परत न जातां भोंवतालच्या अथांग काळोखांत नाहींशीं होऊन गेली.

दुसरें दिवशीं धनंजयाच्या घरीं एकच हाहाःकार उडाला. घरधनीण नाहींशीं झाल्याची वार्ता वणव्याप्रमाणें पसरली. धनंजय आपल्या मित्र-

मंडळींसह रात्रीं बाहेर गेला होता. तो फार उशीरां घरीं परतला आणि तो घरीं आला तो दारूच्या धुंदींतच होता. उमा नाहींशीं झाल्याचें कळतांच मात्र त्याची नशा खाड्कन उतरली आणि तो चांगला शुद्धीवर आला. उमेचा तपास सगळीकडे जारीनें सुरू झाला. गांवांतल्या विहिरी आणि तलाव धुंडण्यांत आले. अखेरशेवटीं पहांटेच्या प्रहरीं उमा नदी-तीरीं आपल्याला एकटीच दिसल्याची वार्ता घोषिणीनें सांगितली. ती ऐकून घरामध्यें रडण्याचा कल्लोळ उडाला. दुःख आणि अपमान यांच्या यातना असह्य झाल्यामुळें उमेनें नदींत उडी टाकून प्राणत्याग केला, या विषयीं सर्वांची खात्री झाली. धनंजयाला तर या बातमीनें भयंकरच धक्का बसला.

त्यानें त्या रात्रीं स्वतःला उमेच्या खोलींत कोंडून घेतलें आणि तिची वस्तू न वस्तू चांचपून बघण्यास प्रारंभ केला. अलंकार आणि वस्त्रप्रावरणें पाहून त्याला रडें कोसळलें. लग्न होऊन उमा घरांत आली त्यावेळची तिची वधू वेषांतली सुंदर व सलज्ज मूर्ति त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. उमेचें सौंदर्य, तिचें प्रेम, तिचा मानीपणा, तिचें गोड वर्तन सारें सारें त्याला आठवलें आणि उमा आज घर सोडून गेली याला आपलें वर्तन जबाबदार, ही कल्पना मनांत आल्यावर त्याच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहूं लागले.

उमेमध्यें काय कमी होतें ? तिच्यांत कसली उणीव होती ? कोणाहि पुरुषाला अभिमान वाटावा असेंच रूप आणि गुण तिच्या ठायीं नव्हते काय ? पण या तिच्या वैभवाचें धनंजयानें काय चीज केलें होतें ? त्यानें व्यसनाच्या नादीं लागून आपलें शरीर व मन यांची खरावी केली होती. पैशांचें वाटोळें केलें होतें. वडिलांच्या नांवाला बट्टा लावला होता. आणि सोन्यासारख्या बायकोचें शेवटीं वाटोळें करून टाकलें होतें ! अरेरे ! काय हा अधःपात ! !

ती सारी रात्र धनंजय उमेच्या खोलींत, तिचे अलंकार व वस्त्रें उराशीं धरून अश्रूपात करीत होता. पहांटे उमेच्या साडीच्या घडीमध्यें त्याला एक पत्र सांपडलें. उमेनें तें पत्र त्यालाच उद्देशून लिहिलें होतें. त्या पत्रांत तिनें म्हटलें होतें–

" प्रिय पतिराज,

तुम्ही मला पत्नी मानण्याचें केव्हांच सोडून दिलें आहे पण मी मात्र तुम्हांला 'पतिराज' म्हणूनच म्हणणार! मी आठ वर्षें तुमच्या घरांत राहिलें, तुमचें अन्न खाल्लें आणि तुमचें प्रेम उपभोगलें. आतां अखेरचा तुमचा निरोप घेतांना एकहि कटु शब्द उच्चारण्याची माझी इच्छा नाहीं. तुमच्या सहवासांत सारें जीवन सुखानें घालवावें ही मला आशा होती; पण नशिबांत कांहीं वेगळेंच लिहिलेलें होतें. त्याला कोण काय करणार?

आतां हें जग सोडून जातांना मी पूर्वीचे दिवस आणि त्यावेळचे तुमचें प्रेम यांचेच स्मरण करणार आहे. माझ्या हातून कधीं कांहीं अपराध घडला असेल तर त्याची मला क्षमा करावी.

शेवटीं एकच सांगतें, आपलें घराणें थोर आहे. त्याला कलंक लागेल असें वर्तन करूं नये. जुने मित्र सोडून द्यावेत. जुनीं व्यसनें टाकावींत. तुमचें हृदय थोर आहे. त्याला साजेसें वागावें; आणि दिवसांतून क्षणभर तरी परमेश्वराचें चिन्तन करावें. अखेर तोच आपला सर्वांचा त्राता आहे.

मी आतां तुमचा निरोप घेतें. तुमच्या आयुष्यांत कधींतरी, घडीभर, वेळ मिळाला तर या दुर्दैवी उमेचें–तुमच्या एकेकाळच्या पत्नीचें–स्मरण कराल काय ? "

धनंजयाचे हात कांपूं लागले त्याच्या हातांतून तें पत्र गळून पडलें, आणि 'उमा' असा हंबरडा फोडून धाडकन् तो जमिनीवर मूर्च्छित होऊन पडला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८५४२
विभाग आ:५।
क्रमांक ३१६२
नों. दि. १५।११।६८

राणीगंज येथें काली आपल्या पतीची—जगत्‌किशोरची—मनोभावानें शुश्रूषा करीत होती. राणीगंज हें खाणींचें व कारखान्यांचें गांव. त्यामुळें तेथील वातावरण नेहमीं धुरानें कळकटलेलें असे. पण तेथील हवा कोरडी व उत्तेजक होती. जगत्‌किशोरसाठीं एक मोटा बंगला भाड्यानें घेण्यांत आला होता. औषधोपचारासाठीं इंग्रजी डॉक्टर होता. शिवाय घरांतल्या माणसांचे मंत्र-तंत्र-गंडे-दोरे व ताईत चालू होतेच. पण तरी जगत्‌किशोरला आराम पडेना.

एके दिवशीं अद्भुत चमत्कार झाला. जगत्‌किशोरच्या आईला एक विलक्षण स्वप्न पडलें. पुरीचा जगन्नाथ तिच्या स्वप्नांत आला. त्यानें तिला आशीर्वाद दिला आणि या आशीर्वादानें आपला मुलगा बरा झाला असें तिनें स्वप्नांत पाहिलें. सकाळीं उठल्यावर आपलें स्वप्न तिनें सर्वांना सांगितलें. हें स्वप्न मंगल आणि शुभसूचक आहे असा सर्वांचा अभिप्राय पडला. पंड्यांनीं आणि भटजींनीं त्या स्वप्नाचा अर्थ असा लावला कीं, जगत्‌किशोरनें, त्याच्या आईनें व पत्नीनें पुरीस जाऊन जगन्नाथाचें दर्शन घ्यावें. ही यात्रा त्यांनीं केली म्हणजे जगत्‌किशोरचें दुखणें पळून जाईल.

ज्या रात्रीं हें स्वप्न पडलें होतें त्याच्या दुसरें दिवशींच शरद् कलकत्त्याहून राणीगंजला आला. तो येतांच कालीनें पुरीच्या यात्रेचा

बेत ठरत असल्याची खबर त्याला दिली. जगत्किशोर अतिशय आजारी होता. अशा अवस्थेंत त्याला यात्रेला न्यावयाची कल्पना शरद्‌ला अगदीं वेडेपणाची व धोक्याची वाटली. त्यानें तसें बोलूनहि दाखविलें. परंतु घरांत सर्वांचा कल यात्रा करावी असाच होता. त्यामुळें शरद्‌ला अधिक कांहीं बोलतां येईना. शेवटीं त्यानें जगत्किशोरच्या इंग्लिश डॉक्टरचा या बाबतींत सल्ला घेतला. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे जगत्किशोरला या यात्रेला न्यावें असाच डॉक्टरांनीं सल्ला दिला. या प्रवासानें जगत्किशोरची प्रकृति बिघडण्याऐवजीं त्याला आराम पडण्याचाच अधिक संभव आहे असें डॉक्टरांनीं सांगितलें. मात्र बरोबर शक्यतों थोडीं माणसें आणि सुखसोयींचीं विपुल साधनें न्यावींत असेंहि डॉक्टर म्हणाले.

डिसेंबर महिन्यांतील एका पहांटेला जगत्किशोर व त्याच्याबरोबरचीं मंडळी राणीगंजहून जगन्नाथपुरीच्या यात्रेला निघालीं. शरद् घोड्यावरून प्रवास करीत होता. आणि सोबतच्या दोन बैलगाड्यांत जेवणाखाण्याचीं भांडीं व गडी होते. शिवाय दोन पालख्यांची व्यवस्थाहि होती. एका पालखींत जगत्किशोर होता. दुसरींत काली व तिची सासू या बसल्या होत्या.

प्रवासाच्या प्रारंभींच आपली प्रवासी मंडळी दामोदर या बंगालमधील प्रचंड नदीच्या काठीं येऊन पोहोंचली. दामोदर नदी ओलांडल्यावर त्यांचा प्रवास पुढें चालू झाला. हिंवाळ्याचे दिवस. सूर्य प्रखरपणें तळपत होता. हवा कोरडी आणि उत्साहवर्धक होती. त्या हवेनें आणि सूर्याच्या ऊबदार किरणांनीं जगत्किशोरच्या शरीराला व मनाला एकदम टवटवी आली. परंतु जगत्किशोरपेक्षांहि या प्रवासाचा अधिक फायदा जर कुणाला झाला असेल तो शरद्‌ला. कलकत्त्यांतील दुःखदायक घटना विसरण्यासाठीं म्हणूनच त्यानें हा प्रवास पत्करला

होता. आणि प्रवासांत वेगवेगळीं दृश्यें बघतांना, आपल्या दुःखाचा संपूर्ण विसर जरी त्याला पडला नसला तरी त्याच्या मनाला पुष्कळसें समाधान मात्र वाटलें खचित. कधीं कधीं मात्र सुधेचें सुंदर मुख अकस्मात् त्याच्या अन्तःचक्षूंपुढें उभें राही आणि आपल्या हेतुशून्य, उजाड भवितव्याच्या कल्पनेनें त्याची छाती दडपून जात असे.

गंगाजलघाटी या लहानशा खेड्यांत मुक्काम पडला तेव्हां कालीनें आपल्या भावाला एकीकडे गांठून त्याला सुधेबद्दल विचारलें. शरद्नें आपण सुधेला मागणी घातल्याचें तिला सांगून टाकलें. पण त्याबरोबरच आईच्या सांगण्यावरून तो विचार आपण आपल्या मनांतून काढून टाकल्याचेंहि पण त्यानें तिला कळविलें. नंतर उद्विग्न चित्तानें तो म्हणाला, " माझ्या या विचारामुळें ताई, तुझें मजवरचें प्रेम कमी तर झालें नाहीं ना ? "

काली त्यावर झटकन् म्हणाली, " दादा, बहिणीचें प्रेम हें असें कमी का होणारें असतें ? "

त्यानंतर त्या बहीण भावंडांत हा विषय पुन्हां निघाला नाहीं.

बांकुरा, विष्णुपूर, मिदनापूर, अशीं गांवें ओलांडीत आपले प्रवासी सुवर्णरेखा नदीजवळ येऊन पोहोंचले. सुवर्णरेखा ओलांडल्यावर ओरियाची सीमा लागली. ओरियांत शिरल्यावर बलसोर, ब्राह्मणी नदी, जयपूर , महानदी अशीं गांवें व नद्या ओलांडीत ते कटकला आले. उमेच्या मृत्यूची दुखःदायक वार्ता शरद्ला कटक येथें कळली. बिंदूप्रमाणेंच उमा ही सुद्धां शरद्ची बालमैत्रीण होती. अर्थात् तिच्या मृत्यूची बातमी ऐकून शरद्ला विलक्षण दुःख झालें यांत नवल तें काय ?

प्रवासांत खंडगिरी पर्वतावरचे बुद्ध भिक्षूंचे मठ आणि भुवनेश्वर येथील हिंदू देवालयें पाहून कालीच्या सासूला फार आनंद झाला. तिचें हृदय भक्तिरसानें उचंबळून आलें. हिंदुस्थानांत प्राचीन कालीं स्थापत्यकला

किती उच्च कोटीला जाऊन पोहोंचली होती याची साक्षच जणूं ते मठ व तीं मंदिरें देत होतीं.

कटकपासून महानदीचा एक फांटा ओलांडला म्हणजे जगन्नाथपुरीच्या यात्रेचा शेवट जवळच आला म्हणावयास हरकत नाहीं. आतां प्रवाश्यांची व यात्रेकरूंची गर्दी प्रतिक्षणाला वाढत चालली होती. भाविक लोकांचे लोटच्या लोट जगन्नाथाच्या रथोत्सवासाठीं पुरीकडे चालले होते. आपले प्रवासीहि या गर्दींतच मिसळून गेले. जगन्नाथाच्या भव्य देवालयाचीं सुवर्ण शिखरें सूर्यप्रकाशांत तळपतांना जेव्हां दिसलीं तेव्हां साऱ्या यात्रेकरूंनीं ‘जगन्नाथजीकी जय’ असा आनंदानें जयघोष केला. तो देखावा पाहून व ती गर्जना ऐकून अगदीं कट्टर नास्तिकाचें दगडी अन्तःकरणसुद्धां भक्तिरसानें पाझरल्याखेरीज राहिलें नसतें. पुरुष, स्त्रिया, वृद्ध, लहान अर्भकें सर्वच जण या जयघोषांत भाग घेत होते. शरदूचें हृदय सद्गदित झालें. हिंदुस्थानांतील असंख्य जनसमुदाय भक्तीच्या एका धाग्यानें कसा एकत्र बांधून टाकलेला असतो याचें प्रत्यंतर जगन्नाथाच्या दर्शनासाठीं लोटलेली ती अफाट यात्रा पाहून त्याला आलें.

हा सारा प्रचंड जनसमुदाय सायंकाळचे प्रहरीं जगन्नाथपुरींत येऊन पोहोंचला. पुरींत पाऊल टाकतांच जगत्किशोरच्या वृद्ध मातेला अतिशय आनंद झाला. भक्तीनें तिचें अन्तःकरण उचंबळून आलें. जगन्नाथपुरींतील जगन्नाथाच्या मंदिराची माहिती तिनें मोठ्या कुतूहलानें शरदूला विचारून घेतली. तेव्हां सुमारें सातशें वर्षांपूर्वी अनंगभीम नामक राजाला आज्ञा देऊन श्रीविष्णूनें त्याच्याकडून आपलें हें मंदिर समुद्रतीरीं मुद्दाम बांधवून घेतलें असें शरदूनें तिला सांगितलें. येथून पुढें हिंदुस्थानांत शिवपूजा मागें पडली व लोक विष्णूला जास्त भजूं लागले असेंहि तो म्हणाला. त्यावर शिव आणि विष्णु हे वस्तुतः एकाच निराकार निर्गुण परमेश्वराची दोन रूपें असून केवळ नांवाच्या वृथा अभिमानामुळेंच शैव आणि

वैष्णव हे परस्परांवर कसे तुटून पडतात यावर त्या उभयतांचें बोलणें झालें.

दुसरें दिवशीं सर्व मंडळी भल्या पहांटेस उठलीं. सूर्योदयाच्या आंत सर्वांनीं एका तळ्यावर आपलीं स्नानें उरकलीं व नंतर अंगावर रेशमीं वस्त्रें घातलीं. त्यानंतर काली व तिची सासू सकाळीं नऊ-दहा वाजेपर्यंत पुरींतलीं निरनिराळीं देवालयें पहात हिंडत होत्या. आज महाप्रसाद होणार असल्यामुळें जेवणखाण तयार करण्याचा प्रश्नच नव्हता.

दहा वाजण्याचे सुमारास सारे भाविक यात्रेकरू जगन्नाथाच्या मंदिराच्या दाराशीं येऊन थडकले. ठराविक वेळीं मंदिराचे दरवाजे उघडले. शरद्च्या खांद्यावर रेलून जगत्‌किशोर आंत गेला. त्यांच्यापाठोपाठ काली व तिची सासू यांनींहि मंदिरांत प्रवेश केला. आवारांतील निरनिराळ्या देवतांना वंदन करून मग यात्रेकरूंनीं मुख्य गाभाऱ्यांत पाऊल टाकलें. गाभाऱ्यांतील अंधुक वातावरणांत रत्नखचित चौथऱ्यावर जगन्नाथाची मूर्ति होती. त्या चौथऱ्यापुढें जातांना प्रत्येक यात्रेकरूंचें मन भीतियुक्त आदरानें दडपून जाई. गाभाऱ्यांतला अंधार नंदादीपांच्या पिवळ्या ज्योतींनीं उजळून निघाला होता आणि उदबत्त्यांच्या व फुलांच्या सुगंधानें वातावरण दरवळलें होतें. पंड्यांच्या मदतीनें एकेक यात्रेकरू चौथऱ्यापुढें येई, आपली पूजा देवाला अर्पण करी आणि भक्तिभावानें देवाला वंदन करून मागें फिरे. जगत्‌किशोरची आई अगदीं शेवटपर्यंत मंदिरांत थांबली. जगन्नाथाला भक्तिपूर्वक वंदन केल्यानंतर अश्रुभरित नेत्रांनीं व सद्गदित कंठानें ती पुटपुटली, " हे सर्वेश्वरा, जगन्नाथा, माझ्या मुलाच्या साऱ्या इडापीडा टाळून त्याला दीर्घायुष्य दे आणि त्याचें घर गोजिरवाण्या मुलांलेकरांनीं भरून जाऊं दे ! तसेंच, हे जगदीश्वरा, मीं सत्तर वर्षें या संसारांत काढलीं आहेत, मला आतां तुझ्या पायांशीं स्थान दे. मी आजपासून तुझ्या सेवेंत आयुष्य घालविण्याची शपथ घेत आहे ! "

सासूनें घेतलेली ती शपथ ऐकून काली चमकली. अश्रू ढाळीत ती म्हणाली, "सासूबाई, अशी शपथ कां घेतली? आम्ही तुमच्याशिवाय बरद्वानला जायचें का? आपणांशिवाय घराला काय शोभा आहे बरें!"

त्यावर कालीच्या सासूनें शांतपणें उत्तर दिलें, "मुली, आतां घराची मालकीण तूंच. माझा तुला आशीर्वाद आहे. अष्टपुत्रा अखंड सौभाग्यवती हो! माझें या जगांतलें कार्य संपलें. आतां मला जगन्नाथाच्या पायांशीं, सेवेंत उरलेलें आयुष्य घालवूं दे!"

शरद्‌च्या आईचा कलकत्त्यांतला एकेक दिवस मोठ्या दुःखाचा आणि कंटाळवाणा असा चालला होता. बनारसला काशीविश्वेश्वराच्या चरणीं आपलें उरलेलें आयुष्य घालवण्याचा तिनें संकल्प केला होता. पण प्रेमाच्या पाशांनीं तिला पुन्हां संसारांत खेंचून आणलें होतें. कालीच्या पतीची प्रकृति सुधारल्याची वार्ता नुकतीच तिच्या कानांवर आली होती आणि जगत्‌किशोरच्या आईनें जगन्नाथपुरींत देवाच्या पायांशीं आपले शेवटचे दिवस घालवण्याचा निर्धार केला आहे हेंहि पण तिला माहीत झालें होतें. त्यामुळें तर पुन्हां बनारसला जाण्याची तीव्र ओढ शरद्‌च्या आईच्या मनाला लागली होती.

शरद्‌चीं पत्रें अधूनमधून येत. त्यांमध्यें तुटकपणा भरलेला असे. शरद्‌ची आठवण झाली कीं त्याच्या आईच्या हृदयांत धस्स होई, आपल्या समाधानासाठीं लग्नाचा विचार दूर करण्यांत शरद्‌नें केवढा त्याग केला आहे आणि तो करतांना त्याच्या हृदयाला केवढया अनंत यातना सहन कराव्या लागल्या आहेत याची पुरेपूर जाणीव शरद्‌च्या आईला होती. त्यामुळें शरद्‌च्या पत्रांतला तुटकपणा बघून तिचा जीव अगदीं उडून गेला आणि आपल्या एकुलत्या एका सद्‌गुणी मुलाचा सारा जन्म आपण दुःखी करून टाकला आहे या जाणिवेनें हृदय तडफडूं लागलें.

उमा एकाएकीं नाहींशी झाल्याची वार्ता कळल्यामुळें तिची आई कलकत्त्याला आली होती. वरचेवर शरद्च्या आईला भेटावयास येई. आणि मग त्या दोघी दुःखी म्हाताऱ्या तासन्तास बोलत बसत. उमेची आई तर फारच दुःखी झाली होती. आपल्या मुलीचे एकेक गुण आठवून ती एकसारखी रडत बसे. बोलतां बोलतां कधीं कधीं उमेबरोबर शरद्चाहि विषय निघे. अशा वेळीं एकदां उमेची आई शरद्च्या आईला म्हणाली, " तुमचा शरद् फार गोड मुलगा आहे हो, तो तुमचें अगदीं पांग फेडील. "

त्यावर एक उसासा टाकून शरद्ची आई म्हणाली, " तो हल्लीं असावा तेवढा आनंदी व समाधानी नाहीं. "

" हं हं " उमेची आई म्हणाली, " तुम्ही त्यानं सुधेला मागणी घातली होती त्या गोष्टीला उद्देशून बोलत असाल; पण बाई, खरं सांगा, विधवेचं का कुणी पुन्हां लग्न केलं आहे ? तो विषयच तुम्ही मनांतून काढून टाका. विचाऱ्या सुधेचं मात्र वाईट वाटतं. काय तिची हल्लीं दुर्दशा उडाली आहे ! चेहऱ्याकडे तर बघवत नाहीं. "

" गरीब विचारी निष्पाप पोर ! " एक दीर्घ निःश्वास टाकून शरद्ची आई म्हणाली, " बाळपणीं विचारी विधवा झाली अन् आतां या शरद्च्या प्रकरणामुळें तिच्यावर दुसरं वैधव्य कोसळलं आहे ! पण तिला तरी यांत काय दोष द्यायचा आहे. बिंदूनं हें ठरवलं तें कांहीं दुष्ट हेतूनं थोडंच ठरवलं ! त्या दोघी बहिणींची यांत कांहींच चूक नाहीं. हे सारे दैवाचे खेळ आहेत दुसरं काय ! "

दुसरें दिवशीं शरद्ची आई बिंदूच्या घरीं गेली. बिंदूनें व तिच्या नवऱ्यानें शरद्च्या आईचें मोठ्या प्रेमानें व आदरानें स्वागत केलें. विचारी सुधा मात्र शरद्ची आई घरांत येतांच एखाद्या चोरट्यासारखी दूर कोपऱ्यांत जाऊन बसली. जणूं तिनें कांहीं महान् अपराध केला आहे !

सुरुवातीला इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी झाल्या. कालीच्या पतीच्या प्रकृतीची विचारपूस झाली आणि नंतर मग साहजिकच शरद्चा विषय निघाला, त्याबरोबर शरद्ची आई गंभीरपणें म्हणाली, " बिंदू, शरदूच्या बाबतींत माझ्या हातून फार मोठी चूक घडली आहे असें मला वाटतें. त्याच्या लग्नाच्या बाबतींत मी ढवळाढवळ करायला नको होती."

बिंदू त्यावर कांहींच बोलली नाहीं. ती स्तब्ध राहिली. मग शरदूची आईच पुढें म्हणाली, " पोरींनो, तुमची आई गेल्यापासून मी तुमच्यावर प्रेम करीत आलें आहे. आज मुद्दाम तुम्हांला आशीर्वाद द्यावयासाठीं मी तुमच्या घरीं आलें. माझी सुधा कुठें आहे? तिला पोटाशीं धरून कधीं एकदां तिच्या तोंडावरून हात फिरवीन असें मला झालें आहे. "

बिंदूनें सुधाला बोलावणें पाठवलें. सुधा आली. शरद्च्या आईनें सुधेकडे एकवार पाहिलें आणि तिच्या काळजांत चर्र झालें. सुधा किती बदलली होती! तिचे गुलाबी गाल फिके पडले होते, गोंडस बाहु कृश झाले होते आणि तिच्या सुंदर डोळ्यांखालीं काळसर वर्तुळें उमटलीं होतीं. बालपणींचें गोड हंसू तिच्या ओठांवरून पुसून गेलें होतें आणि तिच्या भव्य कपाळावर दुःखाची छाया दिसत होती. सुधेनें पुढें येऊन जेव्हां शरद्च्या आईच्या पायांना स्पर्श करून तिला वंदन केलें तेव्हां शरद्च्या आईच्या डोळ्यांतून दुःखाचीं व पश्चात्तापाचीं आसवें घळघळ ओघळूं लागलीं.

त्या दिवशीं रात्रीं बिंदू आपलीं मुलें झोंपवण्यासाठीं माडीवर गेली व शरदूची आई आणि सुधा अशा दोघीच खालीं माजघरांत बसल्या. दिव्याचा अंधुक पिवळसर प्रकाश पडला होता. सुधेनें एखाद्या बालकाप्रमाणें आपलें मस्तक शरदूच्या आईच्या हृदयावर टेकलें होतें व ती अगदीं मुकाट्यानें बसली होती. शरदूच्या आईला बिंदूचें व सुधेचें बाळ-

पण आठवलें. त्यांची विधवा आई आठवली. बोबडें व मंजुळ बोलणारी चिमुकली सुधा आठवली. त्यानंतर त्यांच्या आईचा मृत्यु आठवला. मग बाळपणीं वैधव्य आलेली पण वैधव्यदुःखाची जाणीव नसलेली अल्लड सुधा आठवली. मातृविहीन बालविधवा सुधा शरद्च्या आईच्या प्रेमावर आणि वात्सल्यावर वाढली होती. गतकाळच्या असंख्य स्मृति डोळ्यांपुढें उभ्या राहतांच शरद्च्या आईला गहिंवरून आलें, तिचें हृदय दुःखानें व्याकुळ झालें. दुर्दैवी सुधेची कींव येऊन तिनें तिला अधिकच प्रेमानें आपल्या छातीशीं कवटाळलें आणि मनांतल्या मनांत तिनें ईश्वराची प्रार्थना केली, "परमेश्वरा, ज्या या लेंकरावर लहानपणापासून मी प्रेमाचा वर्षाव करीत आलें आहे तिच्या शिरावर दुःखाची कुऱ्हाड घालण्याचें काम हें माझे हात कधींहि करणार नाहींत. परमेश्वरा, माझ्या हातून फार मोठा अपराध घडला आहे. मी या वेळीं काय करावें ?"

कलकत्त्याच्या दक्षिण विभागांत 'कालिघाट' हें सुप्रसिद्ध मंदिर आहे. देवळापासून कांहीं अंतरावर तालवृक्षांच्या गर्द छायेंत एक चिमुकली झोंपडी दिसत असे. या झोंपडींत सुमारें सत्तर वर्षांचा एक वृद्धब्राह्मण राही. हा ब्राह्मण तालपुष्करच्या 'घोष' घराण्याचा धर्मगुरू होता. एके दिवशीं पहांटे स्नान व देवपूजा उरकून शरद्‌ची आई या आपल्या धर्मगुरूंना भेटावयास आली. तिच्या निरोपासरशीं वृद्ध गुरू झोंपडीबाहेर आले. त्यांच्याबरोबर एक ब्रह्मचारीहि होता. त्याच्या चर्येवर वैराग्याचें व पावित्र्याचें तेज झळकत होतें. त्यानें भगवीं वस्त्रें धारण केलीं होतीं. त्याचें शरीर सामर्थ्यवान् असून डोळे विलक्षण तेजस्वी होते. त्याचे कुरळे केस मानेवर लोळत होते.

शरद्‌च्या आईनें त्या उभयतांना दंडवत घातला. धर्मगुरूंनीं तिला आशीर्वाद दिला आणि मग ते तिघेजण झोंपडींत जाऊन बोलत बसले.

प्रारंभींचे कुशल प्रश्न झाल्यावर धर्मगुरूंनीं शरद्‌च्या आईची, शरद्‌ची व काली, बिंदू आणि उमा यांचीहि विचारपूस केली. उमेच्या दुःखद मरणाची वार्ता जेव्हां शरद्‌च्या आईनें त्यांना सांगितली तेव्हां ब्रह्मचारी म्हणाला, "उमा संसाराला कंटाळली होती खरी, पण एवढ्या तरुण वयांत तिनें नदींत जीव दिला असेल असें मला वाटत नाहीं. आणि ज्या अर्थीं तिला उडी टाकतांना कुणी पाहिलें नाहीं किंवा तिचें

प्रेतहि मिळालें नाहीं त्या अर्थी ही दुष्ट वार्ता बहुधा खोटीच असावी ! "

ब्रह्मचारी हा तालपुष्करचाच मूळ रहिवासी होता. त्यामुळें काली, विंदू, उमा या सर्वजणींना त्यानें लहानपणीं पाहिलेलं होतें. बिंदूचा संसार सुखानें चालल्याचें ऐकून व कालीच्या पतीची प्रकृति सुधारल्याचें कळल्यावर त्याला बरें वाटलें. नंतर तो म्हणाला, " या बिंदूला एक छोटी बहीण होती ना ? तिची काय बातमी आहे ? "

" तिचें तर विचारीचें बाळपणींच दुर्दैव ओढवलें ! " शरद्ची आई म्हणाली, " सुधेला लहान वयांतच वैधव्य आलें आहे. "

"अरेअरे ! ब्रह्मचारी हळहळून म्हणाला, " एवढ्या बालपणींच तिच्यावर हा प्रसंग ओढवावा ना ! पण चिन्ता नाहीं. परमेश्वर सुधेचेंहि भलेंच करील. "

" तुमच्या तोंडांत साखर पडो. " शरद्ची आई चटकन् म्हणाली, " या सुधेबद्दलच कांहीं बोलण्यासाठीं, कांहीं महत्त्वाच्या बाबतींत तुमचा सल्ला घेण्यासाठीं मी आज आलें आहे. माझें मन सध्यां फार गोंधळून गेलें आहे. "

" तुझ्या मनांत जें कांहीं सलत असेल तें बोलून टाक बेटा ! " धर्म-गुरू म्हणाले, " मी तर सध्यां संसाराच्या धकाधकींतून अंग काढून घेतलें आहे. परंतु हा ब्रह्मचारी,–यानें वेद व उपनिषदांचा आणि पुराणांचा चांगला अभ्यास केलेला आहे. हा धर्मशास्त्रेंहि पढलेला आहे. तेव्हां तुला तोच चांगला सल्ला देईल. "

शरद्ची आई क्षणभर स्तब्ध राहिली. नंतर ती हळूंच म्हणाली, " बिंदूची बहीण सुधा बालपणींच विधवा झाली आहे, असं मी आत्तांच तुम्हांला सांगितलं. सुधा आतां तारुण्यांत आली आहे, आणि माझा मुलगा शरद् याचं तिच्यावर मन बसलं आहे. महाराज, आपण या लग्नाला संमति द्याल तर तीं दोघेंजण जन्माचीं सुखीं होतील पण ही



परवानगी त्यांना मिळाली नाहीं तर दोघांचं पुढचं आयुष्य अतिशय दुःखांत जाईल."

शरद्च्या आईचें हें भाषण ऐकून वृद्ध धर्मगुरूंना आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला. शरद्ची आई किती धर्मशील व पापभीरु आहे हें त्यांना माहीत होतें. त्यामुळें आपल्या मुलाचें एका विधवेशीं लग्न व्हावें अशी इच्छा तिनें व्यक्त केलेली बघून त्यांना मोठें नवल वाटलें. ते म्हणाले, "हिंदू विधवेचें पुन्हां लग्न होऊं शकत नाहीं हें तूं जाणत नाहींस का बेटा?"

"तें मला माहीत आहे." शरदची आई म्हणाली, "पण आयुष्यांत कांहीं वेळा अशा येतात कीं ज्यावेळीं धर्माला आणि रूढीला सोडून सुद्धां कांहीं गोष्टी माणसाला कराव्या लागतात ही गोष्ट त्यांतलीच आहे." आणि नंतर तिनें शरद्च्या व सुधेच्या प्रीतीची सर्व कहाणी त्या दोघांना सांगितली. मग अश्रू ढाळीत ती म्हणाली, "मला माझ्या शरद्-कालीइतक्याच बिंदू व सुधा प्रिय आहेत. सुधेचें आयुष्य दुःखांत चाललेलें मला कसें पहावेल? मी सुधेच्या व शरद्च्या प्रेमांत मोडता घातला खरा; पण आतां त्या गोष्टीचा मला पस्तावा होत आहे! मी काय करूं?"

सुधेची करुण कथा ऐकून धर्मगुरूंच्या डोळ्यांत पाणी आलें. ब्रह्मचाऱ्याचे डोळे मात्र विलक्षण रीतीनें चमकले. दोघेहि क्षणभर स्तब्ध राहिले. नंतर ब्रह्मचाऱ्याकडे वळून धर्मगुरू त्याला म्हणाले, "तूं सारीं शास्त्रें जाणतोस. तूंच या प्रसंगीं योग्य तो सल्ला देऊं शकशील!"

त्या शरद्च्या आईकडे वळून ब्रह्मचारी म्हणाला, "मी कोणत्या बाबतींत सल्ला देऊं?"

"विधवेच्या पुनर्लग्नाला कांहीं शास्त्राधार निघतो का तेवढें पहा." शरद्ची आई म्हणाली.

ब्रह्मचारी दृढ स्वरांत म्हणाला, " परमेश्वरी संकेत व आपलीं शास्त्रें यांचा नेहमीं मेळ वसतोच असें नाहीं. पतिनिधनानंतर स्त्रीनें त्याचें स्मरण करीत रहावें असें शास्त्र आहे खरें, पण एखाद्या विधवेला पुन्हां लग्न करावयाचें असलें तर त्या गोष्टीला शास्त्राची बंदी नाहीं. विशेषतः सुधेसारखी मुलगी कीं जिला बाळपणींच वैधव्य आलें आहे, तिला तर पुन्हां लग्न करावयास कसलीच आडकाठी नाहीं. आपले परमपवित्र, परमपूज्य ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं विधवेचें पुनर्लग्न धर्मसंमत असल्याचें मान्य केलें आहे. इतकेंच नव्हे, तर आपल्या परकी सरकारनें सुद्धां असें लग्न कायदेशीर ठरवलें आहे. तेव्हां तुम्ही खुशाल शरदूचें व सुधेचें लग्न करा. परमेश्वर त्या उभयतांवर कृपादृष्टि ठेवल्यावाचून राहाणार नाहीं."

ब्रह्मचाऱ्याचा हा सल्ला ऐकून धर्मगुरूंना संतोष वाटला. ते म्हणाले, "जा बेटा, ब्रह्मचाऱ्याच्या सल्ल्यानुसार तूं आपलें कर्तव्य कर. जगाच्या टीकेकडे लक्ष देण्याचें कांहीं कारण नाहीं."

त्या उभयतांचा शरदूच्या आईनें निरोप घेतला तेव्हां तिचें मन समाधानानें फुलून गेलें होतें.

श्री ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८५४२
विभाग ग्रा. व.
क्रमांक ३१६२
नों. दि. २५।११।५८

# धनंजयाचा मनस्ताप १८

जगत्‌किशोरची प्रकृति आतां उत्तम झाली होती व तो पुरीहून परत आपल्या घरीं आला होता. त्याच्या दुखण्यांत कालीनें त्याची जी मनोभावें सेवा केली होती, त्यामुळें त्या उभयतांमध्यें फार प्रेमाचें व जिव्हाळ्याचें नातें निर्माण झालें होतें. कालीच आतां आपल्या घराची स्वामिनी झाली होती व ती फार चांगल्या रीतीनें घर चालवीत असे. हेमचंद्र व बिंदू पुन्हां तालपुष्करला गेले होते व तेथें हेमचंद्राला बरद्वान परगण्याकडून मुनीमाची उत्तम नोकरी मिळाली होती. शरद्‌च्या आईनें शरद् व सुधा यांच्या लग्नाला आपली संमति दिल्याचें आनंददायक वृत्त कालीला नुकतेंच कळलें होतें व त्यामुळें तीहि फार आनंदांत होती. एके दिवशीं रात्रीं जेवणें झाल्यानंतर काली व तिचा पति हे दोघेजण गप्पा करीत बसले होते. सुधेच्या व शरद्‌च्या भावी संसारसुखाविषयींच्या गोड गोड कल्पना कालीच्या मनांत घोळत होत्या, पण त्याच वेळीं दुर्दैवी उमेचें स्मरण होऊन तिचें मन व्याकुळहि होत होतें. येवढ्यांत त्यांच्या दारावर कुणी तरी थाप मारली. या भलत्यावेळीं आपणांकडे 'कोण आलें असावें याचा कालीला व जगत्‌किशोरला कांहीं केल्या उलगडा होईना. शेवटीं जगत्‌नें बाहेर जाऊन दार उघडलें. कालीहि त्याच्या पाठोपाठ दरवाजाशीं येऊन उभी राहिली. जगत्‌किशोरनें दरवाजा उघडतांच बाहेरून एक उंच, देखण्या व धिप्पाड अशा परकी पुरुषानें आंत पाऊल टाकलें.

काली व जगत् या दोघांनाहि त्याची ओळख पटेना.

"एके काळीं मी तुमचा मित्र होतों–" पाहुणा म्हणाला, "पण आतां माझी ती लायकी राहिली नाहीं. तथापि, जुन्या मैत्रीला स्मरून आजची रात्र आपण मला आसरा द्याल का?"

आतां मात्र कालीला व तिच्या पतीला त्या पाहुण्याची चटकन् ओळख पटली. तो धनपूरचा श्रीमंत जमीनदार–उमेचा पति–धनंजय होता. त्याचा चेहरा फिकट झाला होता. डोळे खोल गेले होते. केंस अस्ताव्यस्त होऊन कपाळावर विखुरले होते. आणि तोंडावर मृत्युकळा पसरली होती.

धनंजयाची ती दुर्दशा पाहून कालीला आणि जगत्किशोरला अतिशय दुःख झालें. जगत्किशोरनें धनंजयला विचारलें, "धनपूरचें आपलें राजवाड्यासारखें घर सोडून तुम्ही असें वणवण कां भटकतां?"

एक उसासा टाकून धनंजय म्हणाला, "तें वैभव भोगावें अशी माझी लायकी नाहीं; मीं भयंकर पातकी आहे. मीं अतिशय दुःख भोगलें आहे. मी शांति मिळविण्यासाठीं सगळीकडे भटकतों आहे. पण ती मला अजून सांपडत नाहीं."

नंतर कालीकडे वळून तो गहिंवरून म्हणाला, "काली, तूं माझी बाळपणाची मैत्रीण आहेस. उमेवर मी फार मोठा अन्याय केला. तूं माझ्याशीं एखादा तरी गोड शब्द बोलशील का?"

कालीला आतां अधिक ऐकवेना. तिचे डोळे भरून आले. पुढें होऊन तिनें धनंजयाचा हात हातीं घेतला आणि त्याला दिवाणखान्यांत आणून बसविलें. नंतर पतीकडे वळून ती त्याच्या कानाशीं कुजबुजली, "धनंजयाच्या हातून कांहींहि चुका घडलेल्या असल्या तरी तो माझ्या उमेचा नवरा आहे. आपल्या घरीं दोन घांस खाल्याशिवाय तो जातां कामा नये." आणि ती स्वयंपाक करण्यासाठीं आंत निघून गेली.

जगत्‌किशोर व धनंजय बाहेरच बोलत बसले. धनंजयानें आपली सर्व करुण कहाणी जगत्‌किशोरला सांगितली; आणि नंतर तो दुःखानें म्हणाला, " पैसा किंवा मित्र गेले त्याचा मला खेद वाटत नाहीं, परंतु मजवर प्राणापलीकडे प्रेम करणाऱ्या शुद्ध, सात्त्विक आणि प्रेमळ उमेच्या मरणाला मी कारण झालों, ह्या कल्पनेनें मात्र माझ्या मनाला भयंकर यातना होतात. मी खुनी आहे; हा विचार मनांत आला म्हणजे मला वेड लागावयाची पाळी येते. हें दुःख मला आतां सहन होत नाहीं. "

धनंजयाच्या खांद्यावर हात ठेवून जगत्‌किशोर मृदु स्वरानें म्हणाला, " तुम्ही इतके वाईट वाटून घेऊं नका. तुमच्या हातून फार मोठें पातक घडलें ही गोष्ट खरी आहे पण अजूनहि सारें कांहीं ठीक होईल, ह्या जगांत असें कुठलेंच पाप नाहीं कीं जें पश्चात्तापानें व तपश्चर्येनें धुवून जाणार नाहीं. परमेश्वर दयाळू आहे. तो तुम्हांला खचित क्षमा करील. "

पण धनंजयाचें दुःख व पस्तावा मर्यादेबाहेर गेला होता. तो पुनः-पुन्हां जुन्या गोष्टी काढून जीवाचा संताप करून घेऊं लागला. त्याच्या त्या यातना कालीला बघवेनात. शेवटीं ती धनंजयाच्या पुढ्यांत येऊन उभी राहिली व त्याला म्हणाली, " उगीच कां असा त्रागा करावा ? या पुढचं आयुष्य तुम्हीं जर सदाचरणांत घालविलं तर परलोकीं गेलेली उमा तुम्हांला क्षमा केल्यावांचून राहणार नाहीं. " धनंजय एकदम चमकला, " खरंच कां तुला असं वाटतं काली ? " तो हलकेंच म्हणाला, " मी यापुढें चांगला वागलों तर उमा मला क्षमा करील कां ? "

" कां नाहीं करणार बरं ? " काली एकदम हुंदके देऊन रडूं लागली, " उमा किती गोड स्वभावाची होती याची तुम्हांला अजून

कल्पना नाहीं. उभ्या जन्मांत तिनं कधीं कुणावर राग ठेवला नाहीं कीं कुणाचा द्वेष केला नाहीं. तुमच्यामुळें तिनें फार दुःखें भोगलीं हें खरं, पण तुमच्यावर तिचा कधींच राग नव्हता. यापुढं तुम्ही चांगलं वागलांत तर ती तुम्हांला क्षमा करीलच !"

धनंजय खालीं मान घालून मुकाट्यानें अश्रू ढाळीत होता. गेले कित्येक दिवसांत लागली नव्हती अशी गाढ झोंप त्या रात्री प्रथमच त्याला लागली.

दुसरें दिवशीं सकाळीं धनंजयनें जगत्‌किशोर व काली यांना एक पत्र दाखवलें. उमेनें घर सोडण्यापूर्वी धनंजयला लिहून ठेवलें होतें तेंच तें पत्र. पत्र वाचतां वाचतां कालीच्या हृदयांत एकदम आशेचा किरण प्रकाशित झाला. ती म्हणाली, "उमा मोठी धार्मिक अन् पापभीरु होती. आत्महत्येसारखं पातक ती कधींच करणार नाहीं. शिवाय माझ्या आईनं कालीघाट येथल्या ब्रह्मचाऱ्याचा सल्ला घेतला. तो देखील उमा अद्याप जिवंत असेल असंच म्हणाला होता. या पत्रांत उमेनें वरद्वानजवळच्या एकशें-आठ देवळांचा उल्लेख केला आहे. न जाणों, उमा एकादें वेळीं तिथें असण्याचासुद्धां संभव आहे."

त्याच दिवशीं सायंकाळीं जगत्‌किशोर, काली आणि धनंजय एकशें-आठ देवळांकडे गेले. तेथें गेल्यानंतर कालीनें हळूहळू चौकशीला सुरुवात केली. तेथें बसलेल्या एका गोसाव्याला ती म्हणाली, "महाराज, एवढ्यांत कुणी सुंदर पण दुःखी तरुण स्त्री तुम्ही इकडे आलेली पाहिलीत कां?"

वैराग्यानें उत्तर दिलें, "होय, अशी एक सुंदर मुलगी मीं कांहीं दिवसांपूर्वी इथें पाहिली होती खरी. फार दुःखी दिसत होती विचारी. प्रथम मला वाटलें; कीं ती विधवाच आहे. पण नंतर तिच्या हातांत मीं सौभाग्यकंकण पाहिलें." कालीनें त्या बैराग्याजवळ आणखी

चौकशी केली, पण त्याहून जास्त माहिती तिला मिळाली नाहीं. यानंतर धनंजय व जगत्‌किशोर चौकशी करूं लागले तेव्हां एका लहान मुलाकडून त्यांना पुढील माहिती मिळाली. ती तरुण स्त्री वैराग्यांच्या मेळ्यांबरोबर गोयपूर खेड्यापर्यंत गेली होती. या यात्रेकरूंपैकीं एक स्त्री गोयपूर येथें राहात असे. धनंजय तेवढ्या रात्रीं गोयपूरला गेला व तेथें त्यानें त्या स्त्रीची भेट घेतली. तिच्याकडून त्याला जी बातमी कळली ती अशी–ती सुंदर तरुणी तालपुष्करची राहणारी होती. आणि तिचें सासर धनपूरला होतें. गोयपूरला त्या स्त्रीनें दोन दिवस मुक्काम केला आणि नंतर बैरागिणींच्या मेळ्यांबरोबर ती गयेला निघून गेली.

एवढी बातमी कळल्यानंतर धनंजयचें काळीज सुपाएवढें झालें. तो जगत्‌किशोरला म्हणाला, " उमा जिवंत आहे, याविषयीं आतां माझी पक्की खात्री झाली. एका मोठ्या पातकांतून मी मुक्त झालों. आतां माझ्या अंगीं एकदम हजार हत्तींचें बळ संचारलें आहे. असाच्या असा मी गयेला जातों आणि उमेचा शोध काढतों. "

त्यानंतर धनंजय तडक गयेला निघून गेला. गयेला पुष्कळ देवळें होतीं आणि फल्गु नदीच्या तीरीं कित्येक लोक आपल्या पितरांना पिंडदान करीत होते. गया हें हिंदूंचें मोठें पवित्र धर्मस्थान आहे. रोज हजारों यात्रेकरू तेथें येणार आणि जाणार. अशा ठिकाणीं उमेचा शोध काढणें हें काम अत्यंत कठीण होतें. पण धनंजयनें तें कार्य शिरावर घेतलें होतें. सारा दिवसभर तो चहूंकडे वणवण भटकला, पण उमेचा पत्ता त्याला लागेना. शेवटीं सायंकाळीं तो गयेच्या प्रचंड देवळाजवळ आला आणि थकून देवळाच्या एका खांबाला टेकून पडला. तो जागा झाला तेव्हां एक पंड्या त्याच्याजवळ उभा होता. त्या पंड्यानें धनंजयाची सर्व हकिकत ऐकली तेव्हां त्याला त्याची फार कींव आली. त्यानें पुष्कळशी चौकशी केली तेव्हां जवळच असलेल्या

बुद्धगया गांवापर्यंत त्याला उमेचा पत्ता लागला. धनंजय धडपडत उठला व बुद्धगयेला आला. तेथें उमा आल्याचें त्याला कळलें पण त्यापुढें तिचा कांहींच शोध लागेना. दुःखानें आणि निराशेनें धनंजयचें हृदय भग्न होऊन गेलें. त्याचें डोकें गरगरूं लागलें. त्याच्या डोळ्यां-पुढें अंधेरी आली.

बुद्धगयेच्या देवळाच्या थंडगार पायऱ्यांवर त्यानें आपलें अंग टाकून दिलें.

दुसऱ्याच क्षणीं त्याची शुद्ध गेली !

धनंजय आपल्या मूर्च्छेतून जागा झाला तेव्हां त्याच्या शेजारी एक सुंदर संन्यासिनी उभी होती. तिच्या अंगावर भगवीं वस्त्रें होतीं. तिच्या हातांत एक काठी होती. तिचीं पावलें अनवाणी होतीं. धनंजयकडे ती टक लावून बघत होती आणि तिचे डोळे पुन्हां पुन्हां अश्रूंनीं भरून येत होते.

डोळ्यावर उन्हें आलीं तेव्हां धनंजयनें डोळे उघडले. आपणांजवळ उभ्या असलेल्या त्या संन्यासिनीला बघून त्याला विस्मयाचा जबरदस्त धक्का बसला. " कोण, उमा ? " तो म्हणाला, " तुला मी स्वप्नांत तर बघत नाहीं ? खरोखरी तूं उमाच ना ? "

" होय, मीच ती ! " उमेनें हळूच उत्तर दिलें, " पण मी आतां परमेश्वराच्या सेवेला माझें जीवन वाहून घेतलें आहे. आतां मी तुमची राहिलें नाहीं."

धनंजय झटकन् पुढें झाला. उमेचे पाय धरून तो म्हणाला, "उमा, मी तुझे असंख्य अपराध केले आहेत. मला त्याबद्दल तूं क्षमा करशील का ? "

उमेचा जीव संकोचानें एवढासा होऊन गेला. आपले पाय मागें घेऊन ती म्हणाली. " हें काय ? माझी कसली क्षमा मागायची ! तो परमेश्वर आपणां सर्वांनाच क्षमा करायला समर्थ आहे ! "

"परमेश्वर मला क्षमा करील कीं नाहीं कोण जाणें." धनंजय दुःखानं म्हणाला, "पण उमा, निदान तूं मला क्षमा कर. मी फार दुःख भोगलं आहे आणि पश्चात्तापाच्या आगींत मीं तावूनसुलाखून निघालों आहे."

त्यानंतर धनंजयनें उमेला तिची सर्व हकिगत विचारली आणि उमेनेंहि आपली दुर्दैवी कथा त्याला निवेदन केली. नंतर ती म्हणाली, "मी आतां संन्यासिनी होऊन उरलेलं सारं आयुष्य परमेश्वराच्या सेवेसाठीं घालवण्याचा संकल्प केला आहे."

"पण उमा—" धनंजय विनवणीच्या स्वरानें म्हणाला, "संसारांत राहूनहि परमेश्वराची सेवा करतां येत नाहीं असें थोडेंच आहे ?"

उमेनें एक उसासा टाकला, "संसारांत राहणें मला जमलें नाहीं, माझ्या हातून चुका झाल्या म्हणूनच तर मी संन्यास पत्करीत आहे." ती पुटपुटली.

"नाहीं उमा—" धनंजय आवेगानें उद्गारला, "संसारांत तूं चुकली नाहींस. मी चुकलों. मी माझ्या कर्तव्यांना जागलों नाहीं. माझ्या चुकांची मला क्षमा करून तूं पुन्हां घरीं येणार नाहींस का ? तुझी आई तुझ्या दुःखानं झुरते आहे. विंदू, काली, सुधा तुझी आठवण काढीत आहेत. उमा, तुझ्या या साऱ्या माणसांना तूं सोडणार काय ?"

उमा रडूं लागली. हुंदके देत देत ती म्हणाली, "मला आतां या मोहांत पाडूं नका. पत्करलेल्या मार्गानेंच मला जाऊं द्या. त्यांतच माझे कल्याण आहे."

धनंजयानें पुढें होऊन उमेचा हात धरला; तो म्हणाला, "उमा, तुझा हा पश्चात्तापदग्ध पति तुला पुन्हां घरीं बोलावीत आहे. पत्नीचीं कर्तव्यें तुला मागें खेंचीत आहेत. उमा, लाडके, माझ्या विनंतीला मान देऊन तूं घरीं येणार नाहींस काय ?"

उमेचें हृदय धडधडूं लागलें. तिचे ओंठ थरथर कांपूं लागले. तिच्या तोंडून शब्द फुटेना.

धनंजयनें उमेला म्हटलें, "उमा, तुझ्या हातांत हें लोखंडी सौभाग्य-कंकण अजून आहे. याचा अर्थ अजूनहि तूं माझी पत्नीच आहेस. तूं घरीं चल!"

—आणि अशा रीतीनें उमेचें व तिच्या पतीचें असह्य विरहदुःखानंतर पुन्हां मधुरमीलन झालें!

तालपुष्करमध्यें वसंतऋतूचे दिवस आले आहेत. हेमचंद्र आणि विंदू पुन्हां आपल्या गांवीं आले आहेत. हेम आपल्या नव्या कामांत अगदीं तन्मय झालेला आहे. विंदू आपलीं आवडतीं गृहकृत्यें करण्यांत मग्न झाली आहे, आणि तिचीं मुलेंबाळें आपल्या आजीच्या अंगाला झोंबून तिला अनुपम आनंद देत आहेत.

शरद्‌चें व सुधेचें लग्न झालें आणि आपल्या नव्या नवरीला घेऊन शरद् तालपुष्करला आला. किती दुःख, किती मानहानि, किती यातना सहन केल्यानंतर त्या दोन प्रेमी जीवांचें मीलन झालें होतें! सुधेचे डोळे आतां आनंदानें चमकत होते आणि तिच्या मुखावर समाधानाचा तांबुस तजेला खेळत होता. वहिणीच्या घरीं मांजराच्या पिलांबरोबर खेळणाऱ्या त्या अल्लड मुलीचें आतां प्रौढ व सुंदर गृहिणींत रूपांतर झालें होतें. ती आतां आपल्या गृहकृत्यांत दिवसभर गढलेली असे.

प्रथम कांहीं दिवस गांवांतल्या लोकांनीं सुधा व शरद्‌च्या विवाहाकडे कुत्सित दृष्टीनें पाहिलें, पण पुढें त्यांच्या टीकेला लौकरच आळा पडला. विशेषतः शरद्‌नें एक जंगी मेजवानी दिल्यावर गांवांतल्या ब्राह्मणांचा त्याच्यावरचा रोष पार वितळून गेला.

उमा लौकरच विश्रांतीसाठीं माहेरीं आली. तिच्या चर्येवरच्या दुःखाच्या खुणा आतां पुसून गेल्या होत्या व तेथें सुखाची गोड छटा झळकत होती.

एके दिवशीं ती सुधेकडे बसावयास आली त्यावेळीं आपल्या गळ्यांतला पांच पदरी मोत्यांचा कंठा तिनें सुधेच्या गळ्यांत घातला व म्हटलें, " सुधा, तुझ्या लग्नाची ही माझी भेट आहे. ती तूं नेहमीं गळ्यांत वाळग. मी माझ्या जीवनांत जीं दुःखें भोगलीं त्यांचा तुला कधींहि स्पर्श न होवो. तुझा संसार सुखाचा होवो ! "

आपल्या वहिनीला भेटायची कालीला फार उत्कंठा लागली होती पण जगत्किशोरच्या संपत्तीला वारस लाभण्याचीं शुभचिन्हें दिसूं लागल्यामुळें यावेळीं प्रवासाचे श्रम करणें कालीला शक्य नव्हतें.

एके दिवशीं सायंकाळीं सुधा तालपुष्करवर पाणी भरण्यासाठीं गेली होती. आकाशांत चांदण्या चमकत होत्या आणि तालवृक्षांचे शेंडे वाऱ्याच्या मंद झुळकीनें सळसळत होते. दूर एका आम्रवृक्षावर कोकिळ कुहू स्वरानें गात होता. तळ्याचें पाणी चांदण्यांच्या मंद प्रकाशानें चमचमत होतें.

सुधेच्या माथ्यावरचा पदर खालीं पडला होता. तिची काळीभोर लांब वेणी कृष्णसर्पाप्रमाणें तिच्या पाठीवर लोळत होती. वाऱ्यानें तिचें वस्त्र फडफडत होतें. जुन्या स्मृतींच्या चिंतनांत ती दंग झाली होती.

तेवढयांत समोरून एक उंच धिप्पाड पुरुष आला. तो सुधेचा पति—शरद्—होता. त्याला पाहतांच सुधा सलज्ज झाली. विनयशील हिंदु गृहिणींच्या रीतीप्रमाणें तिनें चटकन् डोक्यावर पदर घेतला.

शरद् पुढें सरकला आणि म्हणाला, ' इथें एकांतांत एवढा संकोच कशाला? राहूं दे तो पदर खांद्यावर. हें बघ सुधा; मी तुला मुद्दाम एक गोष्ट सांगायला आलों आहे. उद्यां आपण बनारसला जाऊं आणि आईच्या पायां पडून तिचा आशीर्वाद घेऊन येऊं या. "

" होय. जाऊं या उद्यां. " सुधा विनयानें म्हणाली, " मलाहि सासूबाईंच्या पायां पडून त्यांचा आशीर्वाद घ्यायचा आहेच. माझी आई

माझ्या लहानपणीं वारली, पण ही नवी आई मला मिळाली. उद्यांच्या उद्यां आपण त्यांच्या पायां पडून त्यांचा आशीर्वाद घेऊं."

"होय सुधा." शरद् हळूंच म्हणाला, नंतर त्यानें तिला जवळ घेतलें. आणि तिच्या केसांवर आपला गाल टेकून तो म्हणाला, "सुधा, आई अन् तूं—दोघीजणीं मला फार प्रिय आहांत. माझ्या आयुष्यांत यापुढें तूं नेहमीं चांदणीसारखी चमकत रहा आणि मला आनंद व समाधान दे!"

ठाणें ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ३८५४२
विभाग बा. वा.
क्रमांक १६१२.१.६
नों. दि. ३२६२
बालक शाखा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३३९० नों. दि ...
वि. ... क्र. ...

IRBK-0103390

# मुलांकरितां उत्कृष्ट पुस्तकें

| | |
|---|---|
| वि. वि. बोकील | विजय |
| | तुकारामाचा परीस |
| | लाडका राजा |
| | मीनाच्या गोष्टी |
| | मोठी मीना |
| | शहेनशहा |
| | निवडक पसंत |
| | कथाभारत |
| पंडित अनंत कुलकर्णी | किशोर कुंज भाग १ |
| [ संपादित ] | किशोर कुंज भाग २ |
| | माझं लहानपण |
| चिं. वि. जोशी | निवडक गुंड्याभाऊ |
| अनंत काणेकर | निवडक गणूकाका |
| शांता ज. शेळके | तालपुष्कर |
| | मीनाक्षी |
| | निळा दिवा |
| | मालती माधव |
| माधव कानिटकर | भारताचे भाग्यविधाते भाग १-२ |
| दा. न. शिखरे | स्वतंत्र भारताची भरारी |
| का. न. केळकर | शंभर वर्षांपूर्वी |
| वसुंधरा पटवर्धन | जयंताच्या गोष्टी |
| राम अनंत कुलकर्णी | आकड्यांची मौज आणि फौज भाग १-२-३ |

कुलकर्णी ग्रंथागार, पुणें २